विजयादशमीच्या शुभेच्छा

१९३७-२०२६ वर्ष ९०

कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

विकणे आहे

अलिबाग ब्राह्मणआळी युनियन बँकेशेजारील नवीन इमारतीमधील ९५० स्क्वे. फूट क्षेत्रफळाचा व्यापारी गाळा विकणे आहे.

मोहनिश जोग
मो.9970666203

रायगड | मंगळवार | दि. २० ऑक्टोबर २०२६ | अंक १३४ | पृष्ठे ८ | किंमत ५ ₹ | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

रजि. नं. : आर.जी.डी./ए.बी.जी./आर.एस.आर./सी.आर./३०८/९२

कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अलिबाग

(ISO 9001 . 2015 मानांकन प्राप्त तसेच CBS सेवाप्रणाली असणारी रायगड जिल्ह्यातील पतसंस्था)

मुख्य कार्यालय :- कमळ भवन, शिवाजी चौक,अलिबाग,ता.अलिबाग,जि.रायगड ४०२२०१.दूरध्वनी क्र.:०२१४१-२२५७१५/२२७८५५

(ISO 9001:2015 मानांकन प्राप्त तसेच CBS सेवाप्रणाली असणारी रायगड जिल्ह्यातील अग्रेसर पतसंस्था)

शारदीय नवरात्री उत्सव

निमित्त सर्वांना मंगलमय शुभेच्छा..!!

इलेक्ट्रिक चारचाकी वाहन कर्ज योजना

१) वाहन किंमतीच्या/कोटेशनच्या ९०% कर्ज उपलब्ध
२) कर्ज मुदत ६० महिने ३) कर्ज व्याज दर द.सा.द.शे. १०%
४) सदरील योजना ही इलेक्ट्रिक चारचाकी वाहने आर.टी.ओ. कडे नोंदणी केली जातील अशाच वाहनांकरिता राहील.

प्रत्येक कुटुंबाची, कुटुंबातील प्रत्येकाची - कमळ पतसंस्था



सोन्यासारखं सुख, यशाची नवी दिशा
आणि समृद्धीची अखंड साथ लाभो!
आपल्या जीवनात आनंद, समाधान आणि
भरभराटीचा सदैव विजय होवो.
नव्या संकल्पांना यश लाभो आणि प्रत्येकाच्या
स्वप्नांना नवी भरारी मिळो!

सर्व सभासद, शेतकरी, व्यापारी, उद्योजक,
महिला बचतगट व ग्राहक बांधवांना

दसरा आणि विजयादशमीच्या
मनःपूर्वक शुभेच्छा!

शुभेच्छुक

रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, अलिबाग

आरडीसीसी बँक
सहप्रवास प्रगतीचा
ISO 9001-2008 BANK



इंद्रप्रस्थ
अलिबाग

एक निवांत घरकुल
निसर्गाच्या सानिध्यात

1 BHK / 2 BHK
Ready Possession ...फ्लॅटस् उपलब्ध

Rera Website : https://maharera.mahonline.gov.in
Rera Reg. No. :
PR1270002500308

Special Amenities
- Club House with Gym
- Children Garden with Playing Equipments
- Stilt Parking
- Entrance Gate with Security Cabin

Eco-Friendly Features
- Sewerage Treatment Plant (STP)
- Nana - Nani Park
- Water Softner plant

सुख, समृद्धी आणि
यशाची नवी सुरुवात...
दसऱ्याच्या
मंगलमय शुभेच्छा!





Office Address : Indraprastha, Building No. 09, Flat No. G-101, Near Gaondevi Mandir, Gondhalpada, Tal.- Alibag, Dist.- Raigad, 402209.
E-mail : indraprastha2012@gmail.com I Visit : www.indra-prastha.co.in
8180 86 1234 / 8180 85 1234
Building No. 06



लग्नसराई निमित्त खास

सौंदर्य
EXQUISITE JEWELLERY

सणासुदीनिमित्त सादर आहे खास ऑफर!

सोने व चांदीच्या दागिन्यांच्या मजुरीवर 20% OFF*

हिऱ्यांच्या दागिन्यांच्या मजुरीवर upto 100% OFF*

जुने सोने एक्स्चेंजवर 0% कपात

त्वरा करा, हि सुवर्ण संधी केवळ 11 नोव्हेंबर पर्यंत!

*T&C Apply

WHP
वामन हरी पेठे ज्वेलर्स™
सोनेरी क्षणांचे सोबती!®

शॉप नं. 1, ग्राउंड फ्लोअर, सर्व्हे नं. 9, रेवदंडा रोड, नगर पालिका जवळ, अलिबाग, जि. रायगड - 402201. फोन: 02141-221377/477, 9022728828

@wamanharipethejewellers

पनवेल-कर्जत मार्गाच्या कामाला गती

डिसेंबरअखेर काम पूर्ण करण्याचे लक्ष्य; बोगद्यांतील विद्युतकरण, यांत्रिकीकरण सुरू

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल-कर्जत नवीन उपनगरीय रेल्वेमार्गाचे ९९ टक्के काम पूर्ण झाले आहे. मुंबई रेल्वे विकास महामंडळाकडून (एमआरव्हीसी) मुंबई नागरी वाहतूक प्रकल्पाच्या तिसऱ्या टप्प्यांतर्गत (एमयूटीपी-३) हा मार्ग उभारण्यात येत आहे. २९.६ किलोमीटर लांबीच्या या दुहेरी रेल्वेमार्गासाठी २,७८२ कोटी रुपयांचा खर्च मंजूर आहे. डिसेंबर २०२६ पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

एमआरव्हीसीच्या माहितीनुसार, सप्टेंबरअखेर प्रकल्पाचे ९९ टक्के काम पूर्ण झाले आहे. मार्गावरील बहुतांश मोठी बांधकामे पूर्ण झाली आहेत. नऊ मोठे पूल, ३५ छोटे पूल, पाच



रस्ते उड्डाणपूल आणि १६ रस्ते भुयारी मार्गाची कामे पूर्ण झाली आहेत. पनवेल-कर्जत येथील दोन रेल्वे उड्डाणपुलांचे कामही पूर्ण झाले आहे. या मार्गावरील तिन्ही बोगद्यांची कामे पूर्ण झाली आहेत. बोगद्यांतील विद्युत आणि यांत्रिक कामे सध्या सुरू आहेत. एकूण ६९.७० किलोमीटरपैकी ६८.७० किलोमीटर लांबीच्या रेल्वे रुळांची जोडणी पूर्ण झाली आहे. पुणे द्रुतगती मार्गाखालील भुयारी मार्गातूनही रेल्वे रुळांची जोडणी करण्यात आली आहे. पनवेल, चौक आणि मोहापे येथील रेल्वे रुळांशी संबंधित महत्त्वाची कामेही पूर्ण झाली आहेत. नवीन पनवेल स्थानकाची इमारत वापरात आली आहे. चिखले आणि मोहापे स्थानकांच्या इमारतींची कामे पूर्ण झाली आहेत. चौक स्थानकाची इमारत आणि भुयारी मार्गाचे काम पूर्ण झाले असून, फलाटावरील निवारा आणि स्थानक परिसरातील अन्य कामे सुरू आहेत. कर्जत स्थानकावरील फलाट, स्थानकाची इमारत, लिफ्ट, जिने, सरकते जिने आणि इतर प्रवासी सुविधांची कामे अंतिम टप्प्यात आहेत.

इंटरलॉकिंग यंत्रणेच्या चाचण्यासिग्नल यंत्रणेचे ९५ टक्के काम पूर्ण झाले आहे. मोहापे आणि चौक स्थानकांवरील इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग यंत्रणेच्या चाचण्याही पूर्ण झाल्या आहेत. दूरसंचाराशी संबंधित उर्वरित कामे सुरू आहेत. प्रकल्पासाठी आवश्यक खासगी आणि सरकारी जमिनींचे संपादन पूर्ण झाले असून, आवश्यक वनविषयक मंजुऱ्याही मिळाल्या आहेत.

आर्थिक विकासाला चालना मिळेल

रेल्वेमार्गनवा मार्ग सुरू झाल्यानंतर पनवेल ते कर्जत प्रवासासाठी आणखी एक उपनगरीय रेल्वेमार्ग उपलब्ध होणार आहे. त्यामुळे नवी मुंबई, कर्जत आणि रायगड परिसरातील रेल्वे प्रवास अधिक सोयीचा होण्याची अपेक्षा आहे. मुंबई उपनगरीय रेल्वेवरील वाहतुकीचे नियोजनही अधिक सुलभ होणार आहे. तसेच या मार्गामुळे परिसरातील निवासी आणि आर्थिक विकासाला चालना मिळेल, असा दावा एमआरव्हीसीने केला आहे.



सेंट विल्फ्रेड्समध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

। पनवेल । प्रतिनिधी ।

सेंट विल्फ्रेड्स कॉलेज ऑफ लॉ, पनवेल येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी अभिमुखता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची शैक्षणिक कार्यपद्धती, परीक्षा पद्धती आणि कायद्याच्या क्षेत्रातील करिअरच्या संधींची माहिती देणे हा कार्यक्रमाचा उद्देश होता. यावेळी पनवेल न्यायालयातील अधिवक्ता ॲड. भूषण म्हात्रे, बन्सी लाल भारद्वाज, संजय कदम, ॲड. मनोहर सचदेव यांनी कायद्याच्या क्षेत्रातील करिअरच्या संधी, व्यावसायिक शिस्त, नैतिक मूल्ये यांविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पुस्तकी ज्ञानासोबत व्यावहारिक ज्ञान, आत्मविश्वास आणि नेतृत्वगुण विकसित करण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच महाविद्यालयातील विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला होता.

पावसाने पाठ फिरवल्याने भातशेती संकटात

। सोगांव । प्रतिनिधी ।

ग्रामीण भागात पावसाने काही दिवसांपासून पाठ फिरवल्याने भातपिकाला पाण्याची तीव्र गरज निर्माण झाली आहे. अलिबाग तालुक्यातील मुनवली, सोगांव, चोरोंडे, मापगांव, बहिरोळे परिसरातील शेतकरी भातपीक वाचविण्यासाठी मोठी धडपड करत आहेत. अनेक शेतकरी विहिरी तसेच बोअरवेलचे पाणी मोटारीच्या साहाय्याने शेतात सोडून पीक वाचविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

यंदा सुरुवातीच्या काळात समाधानकारक पाऊस झाल्याने भातपिकाची वाढ चांगली झाली होती, मात्र आता पावसाने उघडीप दिल्याने शेतातील पाण्याची पातळी कमी होऊ लागली आहे.



पिकाला वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर सातत्याने पाण्याची आवश्यकता असताना पावसाचा खंड पडल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. भात हे ग्रामीण भागातील प्रमुख खरीप पीक असून, हजारो शेतकऱ्यांचे आर्थिक गणित या पिकावर अवलंबून आहे. पावसाने आणखी दडी मारल्यास उत्पादनावर परिणाम होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. भातपीक वाचविण्यासाठी आता पावसाच्या दमदार पुनरागमनाची प्रतीक्षा शेतकऱ्यांना लागली आहे. पावसाची प्रतीक्षा करण्यापेक्षा पीक वाचविण्यासाठी शेतकऱ्यांनी उपलब्ध पर्यायांचा आधार घेतला आहे. काही ठिकाणी विहिरीतील पाणी मोटारीने शेतात सोडले जात आहे, तर काही शेतकरी कूपनलिकांच्या पाण्यावर भातशेती टिकविण्याचा प्रयत्न करीत आहेत, मात्र सतत मोटार चालविल्याने वीजबिलाचा खर्च वाढत असून, विहिरी व बोअरवेलच्या पाणीसाठ्यावरही ताण येत आहे.

> **"आता पाऊस झाला नाही तर विहीर आणि बोअरिंगच्या पाण्यावर पीक किती दिवस टिकवणार, हा प्रश्न आहे. पीक हातातून जाऊ नये म्हणून मोटारीने पाणी देण्याची धडपड सुरू आहे."**
>
> **-सचिन घाडी, मुनवली,**

दसऱ्यानिमित्त झेंडूच्या फुलांची रेलचेल

■ तोरणे, आपट्याच्या पानांच्या खरेदीसाठी लगबग

। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।

विजयादशमी अर्थात दसरा सण अवघ्या एका दिवसावर येऊन ठेपल्याने पनवेलच्या जुन्या भाजी मार्केटमध्ये सणाच्या खरेदीसाठी नागरिकांची लगबग सुरू झाली आहे. दसऱ्याच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठ विविध रंगांच्या फुलांनी सजली असून, झेंडूच्या पिवळ्या आणि केशरी फुलांनी संपूर्ण बाजाराला आकर्षक रूप प्राप्त झाले आहे.

दसरा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यासाठी महिला वर्गासह नागरिकांनी आतापासूनच खरेदीला सुरुवात केली आहे. घराच्या प्रवेशद्वारावर लावण्यासाठी फुलांची तोरणे, दारावरच्या कमानींसाठी फुलांच्या माळा, तसेच पूजेसाठी आवश्यक असलेल्या साहित्याला बाजारात मागणी वाढली आहे. पारंपरिक दसरा सणात झेंडूच्या फुलांना विशेष महत्त्व असल्याने बाजारात या फुलांची मोठ्या प्रमाणावर आवक झाली आहे.

सध्या झेंडूच्या फुलांचा दर साधारणतः १०० रुपये प्रतिकिलो असल्याचे चित्र बाजारात पाहायला



मिळत आहे. मात्र, फुलांची आवक, मागणी आणि गुणवत्तेनुसार दरांमध्ये चढ-उतार होत आहेत. काही फुलांचे दर वाढलेले असताना, तर काही फुलांचे दर तुलनेने कमी असल्याने ग्राहक आणि विक्रेत्यांना बाजारातील बदलत्या दरांचा अनुभव येत आहे.

दसऱ्याच्या दिवशी घराची सजावट करण्यासाठी विविध रंगांच्या फुलांना पसंती दिली जात आहे. झेंडूच्या फुलांसोबतच इतर सुगंधी फुले, तयार तोरणे आणि सजावटीसाठी लागणाऱ्या पानांचीही विक्री होत आहे.

बाजारात उपलब्ध असलेल्या विविध प्रकारच्या तोरणांमुळे ग्राहकांना आपल्या पसंतीनुसार खरेदी करण्याची संधी मिळत आहे.

सणाच्या पार्श्वभूमीवर फुलविक्रेत्यांनी विविध प्रकारची फुले विक्रीसाठी मांडले आहे. सकाळपासूनच बाजारात खरेदीदारांची वर्दळ वाढू लागली असून, सायंकाळच्या सुमारास ही गर्दी आणखी वाढण्याची शक्यता आहे. दसऱ्याच्या आदल्या दिवशी होणाऱ्या खरेदीमुळे फुलविक्रेत्यांच्या व्यवसायालाही चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

वाचन प्रेरणा दिन उत्साहात

। खांदा कॉलनी । वार्ताहर ।

विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजविण्यासह ज्ञान, विज्ञान आणि राष्ट्रनिर्मितीविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने गोखले एज्युकेशन सोसायटीच्या विधी महाविद्यालयात सोमवारी (दि.१९) ऑक्टोबर ग्रंथालय विभागाच्या वतीने वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. भारताचे माजी राष्ट्रपती आणि थोर शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनकार्याचा आणि प्रेरणादायी विचारांचा यावेळी जागर करण्यात आला. यावेळी प्रा. साक्षी झांटये, प्रा. अनुश्री सावंत, प्रा. गणेश कदम, प्रा. अशोक कुमनाले, प्रा. राजेंद्र कोलल्लूकर यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी मानसी घरत यांनी केले, तर प्रा. राजेंद्र कोलल्लूकर यांनी उपस्थितांचे आभार मानले. 'वंदे मातरम' या गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

श्रीवर्धन बाजारपेठेत आपट्याच्या पानांची आवक

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

स्नेह, आपुलकी आणि नात्यांमधील कटुता दूर करून गोडवा निर्माण करणाऱ्या विजयादशमीच्या सणासाठी श्रीवर्धनची बाजारपेठ सज्ज झाली आहे. दसऱ्यानिमित्त एकमेकांना 'सोनं घ्या, सोन्यासारखं राहा' म्हणत आपट्याची पाने देण्याची परंपरा आजही उत्साहाने जपली जाते.या पारंपरिक 'सोन्या'ची बाजारपेठेत आवक सुरू झाली असून, फांदीच्या जुडीचा दर मात्र, २० रुपये असा माफक आहेत.

हिंदू संस्कृतीतील साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानल्या जाणाऱ्या दसऱ्याला विशेष महत्त्व आहे. सायंकाळी सीमोल्लंघनानंतर आपट्याची पाने देवाला अर्पण केली जातात.त्यानंतर नातेवाईक, मित्रमंडळी आणि परिचितांना ही पाने देऊन शुभेच्छा दिल्या जातात. जुन्या आठवणींसह राग-



लोभ आणि हेवेदावे विसरून नात्यांमध्ये स्नेह वाढवण्याचा संदेश या परंपरेतून दिला जातो.

दसऱ्याच्या आधीपासून ग्रामीण भागातील शेतकरी आणि आदिवासी महिला आपट्याची पाने विक्रीसाठी बाजारपेठेत आणतात. सणाच्या पार्श्वभूमीवर पानांच्या विक्रीला सुरुवात झाली असली, तरी एका जुडी मागे मिळणारी वीस रुपयांची रक्कम पाहता विक्रेत्यांचे उत्पन्न मर्यादितच राहते. दिवसभर मेहनत करून मिळणारा हा हंगामी रोजगार आणि सणाच्या निमित्ताने मिळणारे उत्पन्न, यावर अनेक छोट्या विक्रेत्यांची भिस्त असते.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती त्या मिळकतींचे मालक यांचेकडुन विकत घेणेचे ठरविले आहे.

मालकाचे नाव	सर्व्हे नंबर	हिस्सा नंबर	क्षेत्र हे.आर.	आकार रु. पै.
सुनिल विष्णु टकले	२९	१/अ	१.८४.००	०.८५
	२९	२	१.१६.००पैकी ०.५१.५०	०.४७
श्रीनिधी सुनिल टकले	२८	२	०.३२.२०	३.६५
उज्वला सुनिल टकले सुनिल विष्णु टकले	२८	१	०.३२.३०	३.६५

सबब सदर मिळकतींच्या व्यवहाराबाबत कोणाचीही दान, गहाण, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, तावाकब्जा अथवा अन्य कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी.

वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार आमचे पक्षकारांकडून त्या मिळकतींचे मालकांबरोबर, पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : २०/१०/२०२६

ॲड.सी.बी.ओसवाल
बी.कॉम.एल.एल.बी.
दिनकर - निमकर अपार्टमेन्ट
बाजारपेठ कर्जत, ता. कर्जत,
जि. रायगड -४१०२०१.

दिनांक : २० ऑक्टोबर २०२६

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन आमचे अशिलांनी कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्या पासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मौजे धामणी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत

मालकाचे नाव	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र	आकार	
गुरुनाथ यादव घरत			हे.आर.पॉ.	रुपये	पैसे
	५७	०	००-२८-००	०	२०

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे,
कर्जत - मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही/-
ॲड. अशोक मारुती कोकणे
मो.नं. ७०५८७७८६५३
दिनांक :- २०/१०/२०२६

जाहीर नोटीस

मी खालील वर्णनाची मिळकत माझे अशिल श्री. दिपक गजानन भोपी रा. रुम नं. ७०१, मयुरेश एनक्लेव्ह, प्लॉट नं. २११, सेक्टर-२० बालाजी मंदिर जवळ, नेरूळ, पश्चिम नवी मुंबई नेरुळ रोड, ठाणे ४००७०६ २) श्रीमती स्मिता राजेंद्र बंगलेकर रा.बी. १०३. प्लॉट नं. १३३, श्रीराधा कृष्ण सोसायटी, सेक्टर- ४२ ए, नेरुळ नवी मुंबई ४००७०६ यांचेकडून विकत घेणेचे ठरलेले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

-: मिळकतीचे वर्णन :-

मौजे	भुमापन क्र.	क्षेत्र (हे. आर)	आकार (रू. पैसे)
आक्षी ता. अलिबाग	३६/२	०-१५-६० पो. ख. ०-०१-५० ०-१७-१०	४.७९

वर नमूद मिळकतींपैकी श्री. दिपक गजानन भोपी व श्रीमती स्मिता राजेंद्र बंगलेकर यांच्या मालकीची ०-०८-५० हे. आर पो. ख. ०-०१-५० हे. आर एकूण ०-१०-०० हे.आर आकार २.६१ रु. पैसे हे पूर्ण क्षेत्र तसेच वर नमूद मिळकतीपैकी ०-०५-३८ हे. आर. आकार १.६५ पैकी श्री. दिपक गजानन भोपी यांचा असणारा अविभाज्य हिस्सा या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तीनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्यावी, याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दि. १९-१०-२०२६

सही/-
ॲड.आर.बी. कोसमकर
चिरायु ब्राम्हण आळी, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेतजमिन मिळकत सौ. लता विलास माळी, रा. खांडस, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडुन कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे खांडस, तालुका कर्जत, जिल्हा रायगड

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे. आर. पॉ.)	आकार (रू.पैसे)
८१	३	१-२२-००	१=१२

पैकी लिहुन देणार यांचे हिश्याचे विक्री केलेले क्षेत्र २५ गुंठे

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजुन वरील मिळकतींचा व्यवहार पुर्ण केला जाईल मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि. २०/१०/२०२६

ॲड. कैलास गणपत मोरे
बी. एल.एस, एलएल. बी
प्रभात अपार्टमेंट रूम नं. ४ दुसरा मजला
सुनिल चिक्कीजवळ ता. कर्जत जि. रायगड
मो. नं. ९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली बिनशेती प्लॉट मिळकतीचे मालक १) शिल्पा सुभाष शेणॉय, २) सुभाष कृष्णा शेणॉय रा. पुणे यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे.

बिनशेती प्लॉट मिळकतीचे वर्णन

मौजे नालधे ता. कर्जत, जि. रायगड.

स.नं./प्लॉट नं.	क्षेत्र चौ.मी.	आकार (रू.पै.)
७९/२७	एकुण क्षेत्र २९२ चौ.मी. व त्यामधील घर मिळकत क्षेत्र ४२.३८ चौ.मी	२९.२०

सदर बिनशेती मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, विक्री करार, खरेदी मेन्टेनन्स, मेहेर, वारसाहक्क लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंट हक्क, बँक लोन, वगैरेबाबत कसलाही हक्क व हितसंबंध अथवा हरकत वा तक्रार असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली तक्रार अगर हरकत खाली सही करणार यांच्याकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आणून द्यावी. सदर मुदतीत तक्रार वा हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील व मागाहून येणारी हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. मागाहून येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही हे सर्वांस कळावे.

ठिकाण : कर्जत.
दिनांक : २०/१०/२०२६

सही/-
ॲड. गणपत का. फुलावरे ॲड. गीतांजली जी. फुलावरे
कार्यालय पत्ता: ''मधुतारा बिल्डींग '' गाळा नं. ३
कचेरी रोड, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ८८८८०४५३७६/७७७५९९३०८८

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्री. दिपक गजानन भोपी रा. रुम नं. ७०१, मयुरेश एनक्लेव्ह, प्लॉट नं. २११, सेक्टर-२० बालाजी मंदिर जवळ, नेरूळ, पश्चिम नवी मुंबई नेरुळ रोड, ठाणे ४००७०६ २) श्रीमती स्मिता राजेंद्र बंगलेकर रा.बी. १०३. प्लॉट नं. १३३, श्रीराधा कृष्ण सोसायटी, सेक्टर- ४२ ए, नेरुळ नवी मुंबई ४००७०६ यांचेकडून विकत घेणेचे ठरलेले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

-: मिळकतीचे वर्णन :-

मौजे	भुमापन क्र.	क्षेत्र (हे. आर)	आकार (रू. पैसे)
आक्षी ता. अलिबाग	३६/२	०-१५-६० पो. ख. ०-०१-५० ०-१७-१०	४.७९

वर नमूद मिळकतींपैकी श्री. दिपक गजानन भोपी व श्रीमती स्मिता राजेंद्र बंगलेकर यांच्या मालकीची ०-०८-५० हे. आर पो. ख. ०-०१-५० हे. आर एकूण ०-१०-०० हे.आर आकार २.६१ रु. पैसे हे पूर्ण क्षेत्र तसेच वर नमूद मिळकतीपैकी ०-०५-३८ हे. आर. आकार १.६५ पैकी श्री. दिपक गजानन भोपी यांचा असणारा अविभाज्य हिस्सा या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तीनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) दिवसांचे आत आणून द्यावी, याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग,
दि. १९-१०-२०२६

सही/-
ॲड.आर.बी. कोसमकर
चिरायु ब्राम्हण आळी, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड

कनिष्ठ लिपिक आवश्यक
खोपोली हिंदी विद्यालय

जनता एजुकेशन सोसाइटी एंड ट्रस्ट द्वारा संचालित खोपोली हिंदी विद्यालय अनुदानित हिंदी माध्यम (भाषिक अल्पसंख्याक) मोगलवाडी खोपोली ता. खालापुर जि.रायगड

कनिष्ठ लिपिक (शिक्षण सेवक आवश्यक) **प्रवर्ग** **पद**

शैक्षणिक योग्यता:- किसी भी शाखा से स्नातक (पदवी) प्राप्त, मराठी ३० अंग्रेजी ४० टाइपिंग परीक्षा उत्तीर्ण, MSC-IT- उत्तीर्ण, स्कूल अथवा ऑनलाईन काम का अनुभव वाले व्यक्ती को प्राथमिकता

खुला १

दि. २८/१०/२०२६ को ठीक ११:३० बजे खोपोली हिंदी विद्यालय मोगलवाडी में अपने मूल प्रमाणपत्रों के साथ साक्षात्कार के लिए उपस्थित रहना है।

अध्यक्ष जनता एजुकेशन सोसायटी एण्ड ट्रस्ट
सचिव जनता एजुकेशन सोसायटी एण्ड ट्रस्ट
मुख्याध्यापक खोपोली हिंदी विद्यालय मोगलवाडी

मतदार यादी फेरतपासणीला वेग | **१२ हजार नव्या मतदारांचे अर्ज**

पनवेलची मतदारसंख्या चार लाखांपार

। पनवेल । प्रतिनिधी ।

पनवेल विधानसभा मतदारसंघातील मतदारयादीच्या विशेष सखोल फेरतपासणीला वेग आला आहे. सध्या मतदारसंघात ४ लाख ७०४ मतदारांची नोंद असून, यादीतून वगळण्यात आलेल्या नागरिकांपैकी १२ हजार जणांनी नव्याने मतदार नोंदणीसाठी अर्ज केला आहे. आगामी काळात आणखी ५० ते ८० हजार नवीन मतदारांचे अर्ज येण्याची शक्यता निवडणूक विभागाने व्यक्त केली.

पूर्वी सुमारे ६ लाख ८४ हजार मतदार होते. एसआयआर प्रक्रियेत त्यापैकी ४ लाख ७०४ मतदारांची नावे कायम राहिली असून, उर्वरित सुमारे दीड लाख नावे यादीतून वगळण्यात आली आहेत. मागील निवडणुकांतील मतदानाच्या आकडेवारीचा आधार घेऊन मतदारयादीची फेरतपासणी केली जात आहे.



एसआयआरमध्ये अर्ज न केलेल्या २ लाख ८३ हजार मतदारांच्या नोंदींची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ८९ हजार मतदारांची नावे २००२च्या मतदारयादीशी जुळली नाहीत, तर ६१ हजार मतदारांच्या नाव, वय किंवा पत्त्यामध्ये दुरुस्ती आवश्यक असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी पवन चांडक यांनी सांगितले. संबंधित मतदारांना याबाबत नोटिसा देण्यात आल्या आहेत.

२००२ मध्ये केवळ १ लाख ६० हजार मतदार होते. गेल्या २४ वर्षांत ही संख्या ४ लाखांवर पोहोचली आहे. विशेषतः खारघर आणि कामोठे परिसरात मतदारसंख्येत मोठी वाढ झाली आहे.

मतदारयादी फेरतपासणीसाठी मतदारसंघातील ५७४ मतदान केंद्रांवर ५७४ बीएलओ नियुक्त करण्यात आले आहेत. हे अधिकारी घरोघरी भेट देऊन मतदारांची माहिती व आवश्यक कागदपत्रे घेत आहेत. नागरिकांना कागदपत्रे बीएलओंकडे प्रत्यक्ष देण्यासोबतच व्हॉट्सपद्वारे पाठविण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

> **"मतदारांनी एसआयआर प्रक्रियेबाबत संभ्रम बाळगण्याची गरज नाही. बीएलओ १२ नोव्हेंबरपर्यंत घरोघरी भेट देऊन आवश्यक माहिती व कागदपत्रे घेतील. नागरिकांनी बीएलओंना सहकार्य करून कागदपत्रे वेळेत उपलब्ध करून द्यावीत. नाव वगळण्यापूर्वी संबंधितांना सुनावणीची पूर्ण संधी दिली जाईल."**
>
> **-पवन चांडक**
> **निवडणूक निर्णय अधिकारी**

नाव वगळण्यापूर्वी संबंधित मतदाराला मोबाइल संदेश, प्रत्यक्ष नोटीस आणि सुनावणीची संधी दिली जाणार आहे. वगळण्यात येणाऱ्या नावांची यादी राजकीय पक्षांच्या बूथ लेव्हल एजंटनाही देण्यात येणार आहे.

१९३७-२०२६ वर्ष ९०

कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड | मंगळवार | दि. २० ऑक्टोबर २०२६ | अंक १३४ | पृष्ठे ८ | किंमत ५ ₹

| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-28 | krushival.in

हरिहरेश्वर गावामध्ये मगरीचा थरार



श्रीवर्धन : तालुक्यातील हरिहरेश्वर गावात रविवारी मध्यरात्री एक थरारक आणि अंगावर काटा आणणारी घटना घडली. मध्यरात्री ठीक १ वाजण्याच्या सुमारास येथील एका हॉटेलच्या आवारात पूर्ण वाढ झालेली आणि धष्टपुष्ट महाकाय मगर अचानक पाहायला मिळाल्यामुळे संपूर्ण गावात एकच खळबळ उडाली. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते; परंतु, ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे •➤पान ५ वर

खैर तस्करी प्रकरणावर वनविभागाचा गोलमाल?



श्रीवर्धन : जिल्ह्यात वनविभागाने खैर लाकूड तस्करी विरोधात रात्रीच्या अंधारात मोठी कारवाई केल्याचा दावा केला असला, तरी ही कारवाई आता एका मोठ्या घोटाळ्याच्या भोवऱ्यात सापडली आहे. कागदोपत्री दाखवलेला आकडा आणि प्रत्यक्षात जप्त केलेल्या लाकडाची किंमत यात जमीन-अस्मानाचा फरक असल्याचा पर्दाफाश झाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस •➤पान ५ वर

गोकुळमध्ये शेकापचा झंझावात

। कोल्हापूर । विशेष प्रतिनिधी ।

कोल्हापूरच्या सहकार क्षेत्रात प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीत शेकापसह राजर्षी शाहू समविचारी आघाडीने बाजी मारली आहे. एकूण २५ जागांपैकी समविचारी आघाडीचे १३ उमेदवार विजयी झाले असून, या निवडणूकीत समविचारी आघाडीने महायुतीवर मात केली आहे. या निकालाने महायुतीच्या मातब्बर नेत्यांना जोर का झटका लागला असून, पराभव न पचल्याने त्यांनी फेरमोजणीची मागणी केल्याची माहीती सुत्रांकडून मिळाली. सहकार क्षेत्रातील प्रस्थापित राजकीय ताकदीला धूळ चारत शेतकरी कामगार पक्षाने गोकुळच्या निवडणुकीत आपली छाप उमटवली आहे. शेकापचे बाबासाहेब देवकर यांच्या विजयामुळे सहकाराच्या आखाड्यात लाल बावट्याचीच चर्चा रंगली आहे. शेतकरी, कष्टकरी आणि दूध उत्पादकांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या शेकापच्या राजकीय भूमिकेला या घडाम ेडीमुळे महत्त्व पारदर्शकता, नियोजन आणि उत्पादकांच्या हिताला प्राधान्य मिळणे आवश्यक आहे. •➤पान ५ वर



■ बाबासाहेब देवकर विजयी; जयंत पाटील, आ. सतेज पाटील यांच्याकडून प्रस्थापितांना धक्का

■ समविचारी आघाडीचे १३ उमेदवार विजयी



शेतकरी-कष्टकऱ्यांच्या विचारांचा लाल बावटा

शेतकरी कामगार पक्षाची राजकीय ओळख ही केवळ निवडणुकांपुरती मर्यादित नाही. शेतकरी, कष्टकरी, कामगार आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांवर संघर्ष करणे, हा पक्षाच्या राजकारणाचा केंद्रबिंदू राहिला आहे. सहकार क्षेत्रातही दूध उत्पादकांचे प्रश्न, दूधदर, उत्पादन खर्च आणि संस्थांच्या कारभारातील पारदर्शकता हे मुद्दे महत्त्वाचे आहेत. गोकुळसारख्या महत्त्वाच्या सहकारी संस्थेत बाबासाहेब देवकर यांच्या विजयामुळे या प्रश्नांना व्यासपीठ मिळाली असल्याचे मत बाबासाहेब देवकर यांनी व्यक्त केले.

समविचारी आघाडीचे विजयी उमेदवार

१. बाबासाहेब देवकर- २५५५
२. शशीकांत पाटील-चुयेकर
३. किसन चौगले
४. बाबासाहेब चौगले
५. राहुल देसाई
६. विद्याधर गुरबे
७. अभिजीत तायशेटे
८. विश्वजीत जाधव
९. अंजना रेडेकर
१०. भाग्यश्री डोंगळे
११. शशीकांत खोत
१२. राजू आवळे
१३. बयाजी शेळके

गोकुळमध्ये दूध उत्पादकांच्या हिताचे निर्णय होतील

। कोल्हापूर । विशेष प्रतिनिधी ।

जयंत पाटील यांचा विश्वास

गोकुळच्या कारभारात सुधारणा होणार

गोकुळच्या निवडणुकीत समविचारी आघाडीला मिळालेले यश हे पुढील कामकाजासाठी महत्त्वाचे पाऊल आहे. या यशाचे खरे मूल्यमापन आगामी काळात होणाऱ्या निर्णयांवर आणि दूध उत्पादकांना मिळणाऱ्या लाभावर होईल. सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखाली गोकुळच्या कारभारात सुधारणा घडतील आणि दूध उत्पादकांचे हित जपले जाईल, असा विश्वास जयंत पाटील यांनी व्यक्त केला.

गोकुळ दूध संघाच्या निवडणुकीत आमदार सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखाली समविचारी आघाडीने मिळविलेले यश हे त्यांच्या नेतृत्वक्षमतेची आणि स्वच्छ प्रतिमेची पोचपावती आहे. महाविकास आघाडीने सतेज पाटील यांना या निवडणुकीत सर्व अधिकार दिल्याने विजयाचा मार्ग सुकर झाला. सतेज पाटील यांनी आपल्या राजकीय आणि सामाजिक जीवनात स्वच्छ चारित्र्य जपले असून, समाजकारण करताना राजकारणाला कधीही प्राधान्य दिले नाही. त्यांच्या याच कार्याची दखल गोकुळच्या निकालातून घेतली गेली आहे, असे प्रतिपादन शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी केले.

गोकुळची निवडणूक ही केवळ संचालक निवडण्याची प्रक्रिया नव्हती, तर दूध उत्पादकांच्या विश्वासाची आणि सहकार क्षेत्रातील नेतृत्वाची कसोटी होती. या निवडणुकीत सतेज पाटील यांनी नियोजनबद्ध पद्धतीने नेतृत्व केले. महाविकास आघाडीने त्यांच्यावर विश्वास दाखवून निर्णयस्वातंत्र्य दिले. त्यामुळे निवडणुकीतील रणनीती आखण्यापासून ते उमेदवार निश्चित करण्यापर्यंतच्या प्रक्रियेत सुसूत्रता राहिली. या एकजुटीचा फायदा समविचारी आघाडीला झाला, असे जयंत पाटील यांनी नमूद केले.



सतेज पाटील हे उत्तम प्रशासक असून, संस्थेचा कारभार लोकाभिमुख पद्धतीने चालविण्याची क्षमता त्यांच्यात आहे. गोकुळसारखी महत्त्वाची सहकारी संस्था दूध उत्पादकांच्या आर्थिक जीवनाशी जोडलेली आहे. त्यामुळे या संस्थेच्या कारभारात •➤पान ५ वर

वेधक

मॅगी पॅकेटमध्ये जिवंत किडे

म्हसळा : लहान मुलांचा आवडता पदार्थ असलेल्या मॅगीमध्ये चक्क जिवंत किडे आढळल्याचा धक्कादायक प्रकार म्हसळा शहरातून समोर आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, म्हसळा शहरातील एका घरात गृहिणीने नेहमीप्रमाणे मुलांसाठी मॅगी उकडायला टाकली. पाणी उकळल्यानंतर वर दोन किडे तरंगताना दिसले. सुरुवातीला भांड्यात आधीपासून किडे असतील असे वाटले. मात्र, संशय आल्याने जेव्हा पॅकेट तपासले, तेव्हा सीलबंद पॅकेटच्या आतही एक किडा रेंगताना दिसून आला. हा प्रकार पाहताच कुटुंबाची झोपच उडाली. सध्या लहान मुलांमध्ये •➤पान ५ वर



दूध प्रकल्पांवर एफडीएचा बडगा

पनवेल : दूध व दुग्धजन्य पदार्थांमध्ये भेसळ होत असल्याच्या संशयावरून अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) तळोज्यातील तीन प्रकल्पांवर कारवाई केली आहे. उत्पादन प्रक्रियेत स्वच्छता आणि दूध साठवणुकीचे नियम पाळले जात नसल्याचे प्राथमिक तपासात आढळल्याने तिन्ही प्रकल्पांचे परवाने निलंबित करण्यात आले. या कारवाईत १,४९४ लिटर दूध नष्ट करण्यात आले, तर दही देखील जप्त करण्यात आली आहे. याप्रकरणी सहा जणांविरुद्ध तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तळोजा औद्योगिक वसाहतीतील तोंडरे गावाजवळील बालाजी औद्योगिक पार्कमधील मातेश्वरी फूड्स, •➤पान ५ वर

जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड

पनवेल : करंजाडे येथील सेक्टर ५ मध्ये सुरू असलेल्या जुगारावर पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली. या प्रकरणी जुगार चालविणाऱ्या एका व्यक्तीसह पैसे लावून जुगार खेळणाऱ्या १० जणांविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी कारवाईदरम्यान रोख रकमेसह विविध कंपन्यांचे मोबाईल फोन असा एकूण २ लाखाचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास करंजाडे सेक्टर ५ येथील एक व्यक्ती जुगार चालवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी संबंधित ठिकाणी कारवाई केली. •➤पान ५ वर

देशासह राज्यात दडपशाहीचे वातावरण

। मुंबई । प्रतिनिधी ।

देशासह महाराष्ट्रात मुंबई अशा अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांचे त्यांच्या न्याय हक्कासाठी शांततेच्या मार्गाने आंदोलने सुरु आहेत. मात्र, आंदोलने मोडीत काढण्यासाठी सरकारने पोलीस बळाचा वापर सूरू केला आहे. सोशल मिडीयावरील अकाऊंट बंद करण्यापासून आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांना डांबून ठेवण्याचा प्रकार सर्रास सुरु आहे. पोलिसांच्या या दडपशाहीचा तीव्र निषेध व्यक्त केला जात असून, ही दडपशाही थांबवा अन्यथा उग्र आंदोलन करावे लागणार, असा इशारा शेकाप पुरोगामी विद्यार्थी संघटनाच्या प्रमुख साम्या कोरडे यांनी दिला आहे. मुंबईमध्ये सोमवारी (दि.१९) आयोजित पत्रकार परिषदेमध्ये त्या बोलत होत्या. •➤पान ५ वर



■ पोलिसांच्या अनाधिकृत कारवाईचा निषेध

■ साम्या कोरडे यांचा आंदोलन छेडण्याचा इशारा

> विद्यार्थ्यांचे आंदोलन वेगवेगळ्या मार्गाने चिरडण्याचा प्रयत्न केला जात आहे. नोटीस न देता बेकायदेशीररित्या सोशल मिडीयावरील पोस्ट व व्यंगचित्र काढले जात आहेत. अकाऊंट बंद केले जात आहे. देशातील भारतीयांनी सत्ताधाऱ्यांविरोधातील पोस्ट बघू नये म्हणून ही कारवाई केली जात आहे. विश्वगुरू असलेल्या पंतप्रधानांना विद्यार्थ्यांच्या पोस्टची भीती का आहे?
> – गौरव सर्जेराव, व्यंगचित्रकार

चॉपरने वार करून दुखापत

। रसायनी । प्रतिनिधी ।

खालापूर तालुक्यातील चौक वावंढळ गावातील इस्कॉन साईटवर रविवारी (दि.१८) जुन्या वादातून मारहाण झाल्याची घटना घडली. या घटनेत एकावर चॉपरने वार करून गंभीर दुखापत केल्याचा आरोप असून, त्यांच्या भावालाही हाताबुक्क्यांनी मारहाण करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, •➤पान ५ वर

दक्षिण रायगडमध्ये पाऊस

■ परतीच्या पावसामुळे दिलासा

■ हवेत गारवा निर्माण झाल्याने नागरिक सुखावले

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

दिर्घ प्रतिक्षेनंतर रायगड जिल्ह्यातील अनेक भागांत सोमवारी (दि.१९) पाऊस कोसळला. जिल्ह्यातील दक्षिण रायगडमध्ये वादळी वाऱ्यासह परतीच्या पावसाने हजेरी लावली. गेली अनेक दिवस उष्णतेने त्रस्त झालेले नागरिक हवेत गारवा निर्माण झाल्याने सुखावून गेले आहेत.

सप्टेंबरपासून पावसाने जिल्ह्यात दडी मारली होती. पावसाअभावी भात पिकांवर करपासह अन्य पिकांचा रोगांचा प्रादुर्भाव वाढला होता. पाऊस नसल्याने धरणांसह नदी, तलावांमधील पाणी पातळीही कमी होण्याची भिती निर्माण झाली होती. ऑक्टोबर हीट सुरुवातीपासूनच जाणवू लागली होती. सकाळी १० वाजल्यापासून कडक ऊन जाणवत असल्यामुळे घराबाहेर पडणे कठीण झाले होते. त्यामुळे कधी पाऊस पडणार याकडे जिल्ह्यातील नागरिकांचे लक्ष लागून राहिले होते. अखेर सोमवारी दुपारनंतर दक्षिण रायगडमध्ये विशेषतः महाड व माणगावमध्ये ढगांच्या गडगडाटासह परतीच्या पावसाने जोरदार हजेरी लावली. ढगाळ वातावरण आणि विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी पडल्या. परतीच्या पावसाने हजेरी लावल्याने या भागातील नागरिक सुखावून गेले आहेत. हवेत गारवा निर्माण झाल्याने अनेकांनी सुटकेचा श्वास सोडला.



८६ हजार कोटींची देयके प्रलंबित

■ अधिकाऱ्यांच्या घरचे नळ बंद करणार

■ कंत्राटदार महासंघाचा प्रशासनाला इशारा

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

सार्वजनिक बांधकामसह जलजीवन, पर्यटन, आदीवासी अशा अनेक विभागाकडील साधारणतः ८६ हजार कोटी रुपयांची देयके दोन वर्षांपासून प्रलंबित असल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघाने केला आहे. त्यामुळे कंत्राटदार मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहे. संबंधित विभागातील अधिकारी याकडे गांभीर्याने लक्ष देत नाहीत. त्यामुळे त्यांच्या कारभाराबाबत तीव्र नाराजी कंत्राटदारांनी व्यक्त केली आहे. कामाचे पैसे वेळेवर दिले नाही तर आगामी काळात अधिकाऱ्यांच्या घरचे नळ बंद करणार, अशा इशारा कंत्राटदार महासंघाने दिला आहे. याबाबत त्यांनी रायगडचे पालकमंत्री भरत गोगावले यांना निवेदन दिले आहे.



महासंघाच्या निवेदनानुसार, सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, आदिवासी, पर्यटन, ग्रामविकास, जलसंपदा अशा वेगवेगळ्या विभागांतर्गत कंत्राटदारांमार्फत कामे करण्यात आली आहेत. जलजीवन योजनेचीदेखील अनेक कामे केली आहेत. मात्र, केलेल्या कामांचा निधीच शासनाकडून उपलब्ध झाला नाही. अधिकाऱ्यांकडूनदेखील सहकार्य मिळत नाही. त्यामुळे कंत्राटदार मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत. मागील •➤पान ५ वर



प्रथम क्रमांक

१) सौ. रश्मी अपुर्व पाटील, पेझारी
२) श्री. गजानन त्रिंबक म्हात्रे, थळ
३) श्री. योगेश प्रकाश वार्डे, रांजणपाडा-आवास
४) श्री. अनिल नारायण वर्तक, वरसोली
५) श्री. विनोद मेहेता, माणगाव
६) श्री. अजिंक्य शेळके, डोंगरी-मुरुड
७) श्री. पांडूरंग विष्णू घरत, लोणारे-थळ
८) श्री. पांडूरंग आरेकर, मुरुड
९) श्री. प्रथमेश दत्ताराम पाटील, दिवीपारंगी-अलिबाग
१०) श्री. चेतन संजय घरत, वरसोली-अलिबाग

द्वितीय क्रमांक

१) सौ. मितल राजेंद्र नाईक, रेवदंडा
२) श्री. संतोष खडतर, चेरवली-माणगाव
३) श्री. रोशन शिवराम म्हसकर, नार्पोली-पनवेल
४) श्री. प्रकाशदादा ठाकूर, झिराड
५) श्री. राजाराम दामोदर पाटील, डावळे-नागाव
६) श्री. मनोज सदाशिव भवारे, दहिवली-नेरळ
७) सौ. छाया विलास भिडे, पेण
८) मोंढे कुटूंब, मुनवली-अलिबाग
९) श्री. अनंत विष्णू पाटील, रामनाथ-अलिबाग
१०) श्री. समीर सावंत, तळवडे(गोठेघर) अलिबाग

विजेत्यांनी आपले बक्षीस २२ ऑक्टोबर ते २८ ऑक्टोबर २०२६ पर्यंत दु. १२ ते सायं. ४ या कालावधीत कृषीवल कार्यालयातून येऊन घेऊन जाणे.

टीप : विजेत्यांनी येताना आपले फोटो असलेले ओळखपत्र सोबत घेऊन येणे.

पत्ता : कृषीवल कार्यालय, वेश्वी, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०

शंभर टक्के निधी खर्च करण्याचे नियोजन | **पालकमंत्री भरत गोगावले यांची माहिती**

५९४ कोटीच्या वार्षिक आराखड्याला मंजूरी

। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्याच्या२०२६-२०२७च्या ५९४ कोटी रुपयांच्या वार्षिक विकास आराखड्याला मंजूरी मिळाली आहे. त्यामध्ये ५१७ कोटी सर्वसाधारण वार्षिक योजना, अनुसूचित जाती उपयोजनासाठी २८ कोटी आणि आदिवासी उपयोजनासाठी ४९.६६ कोटी रुपयांचा समावेश आहे. या अंतर्गत विकास कामांना गती देण्यात आली असून शंभर टक्के निधी खर्च करण्याचे नियोजन केले असल्याची माहिती पालकमंत्री भरत गोगावले यांनी दिली.

जिल्हा नियोजनाची आढावा बैठक सोमवारी (दि.१९) जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात घेण्यात आली. यावेळी खासदार सुनील तटकरे, खासदार श्रीरंग बारणे, महिला व बाल विकासमंत्री आदिती तटकरे, आमदार महेंद्र थोरवे, जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक आंचल दलाल, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले तसेच जिल्ह्यातील वेगवेगळया विभागातील अधिकारी उपस्थित होते.



जिल्हा विकास आराखडा २०२५-२६ जिल्हा वार्षिक (सर्वसाधारण) योजनेसाठी ४८१ कोटी रुपये, अनुसूचित जाती उपयोजनासाठी २८ कोटी आणि आदिवासी उपयोजना करिता ४५.३ कोटी असे एकूण ५५४.३ कोटी रुपयांचा होता. हा सर्व निधी शंभर टक्के वितरीत करण्यात आला असून, सप्टेंबरपर्यंत ८७.४५ टक्के निधी खर्च झाला आहे. हा सर्व निधी खर्च करण्याबाबत जिल्हा परिषद यंत्रणांना योग्य त्या सुचना देण्यात आल्या आहेत. निधी संपूर्णपणे खर्च करण्याचे नियोजन केले असल्याची माहिती जिल्हा नियोजन कार्यालयाकडून देण्यात आली. राज्यात निर्माण झालेल्या गंभीर दुष्काळी परिस्थितीची दखल घेत राज्य सरकारने सुमारे ३०५ तालुक्यांमध्ये दुष्काळ घोषित केला आहे. जिल्हा स्तरावरील संबंधित यंत्रणांमार्फत विविध शासकीय योजनाअंतर्गत टंचाईवर मात करण्यासाठी तातडीने उपाययोजना राबविल्या जात आहेत. नागरिकांना पिण्याच्या पाण्याची कोणतीही कमतरता भासू नये, यासाठी योग्य व नियमीत पाणी पुरवठा सुनिश्चित केला जात आहे. ग्रामीण भागातील पशुधनासाठी पुरेसे पाणी चारा, उपलब्ध करून देण्यावर विशेष भर दिला जात आहे. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर होणारी गुंतवणूक व रोजगार टीकविण्यासाठी औद्योगिक क्षेत्रालालाही आवश्यक पाणी पुरवठा करण्याचे नियोजन केले आहे. सर्व घटकांच्या गरजांचा समतोल राखून टंचाईवर मात करण्यासाठी प्रशासन कटीबद्ध असल्याची माहिती पालकमंत्री गोगावले यांनी दिली.

मस्क यांचे शिव्याशाप

एलॉन मस्क नावाचा एक अमेरिकी लुटारू भांडवलदार सध्या भारताच्या नावाने शिव्याशाप देतो आहे. आपल्या स्टारलिंक कंपनीचा अर्ज भारत सरकारकडे तीन-चार वर्षांपासून पडून असून त्यावर काही निर्णय होत नाही असे म्हणून त्यांनी आकांडतांडव केले आहे. मुकेश अंबानी यांच्या दबावामुळेच भारत सरकार हा विलंब करीत असल्याचा त्यांचा आरोप असून मुकेश यांचा उल्लेख पंतप्रधान अंबानी असा केला आहे. नरेंद्र मोदी सरकार, अंबानी आणि अदानी यांच्या नतद्रष्ट युतीबाबत अनेकदा बोलून झाले आहे. त्यात बदल होण्याचे कारण नाही. या दोन्ही उद्योगपतींना फायदा होईल अशी धोरणे मोदी सरकारने वेळोवेळी राबवलेली आहेत. अदानीला तर देशातील मिळेल ती वस्तू विकण्याचा सपाटा मोदींनी लावला आहे. पण म्हणून मस्क यांच्या बोलण्याला पाठिंबा देण्याचे कारण नाही. कारण हा मस्क हा कोणी साधू, संत, समाजसुधारक किंवा कार्यकर्ता नाही. तो या अंबानी व अदानीचाच भाऊबंद आहे. समाजकार्य किंवा गरिबांचे कल्याण वगैरेंसाठी तो भारतात येऊ मागतो आहे असे अजिबात नाही. त्याला इथले सर्वात मोठे मार्केट खुणावते आहे. ते आपल्या कह्यात घेण्याची त्याची इच्छा आहे. ती पूर्ण होत नसल्याने त्याचा चडफडाट चालू आहे. त्यामुळे राहुल गांधी यांनी या वादात मस्क यांची बाजू घेऊन मस्क यांचे स्वागत करणे हे अत्यंत गैर होते. असो. थेट उपग्रहामार्फत इंटरनेट सेवा पुरवणे हे मस्क यांच्या कंपनीचे वैशिष्ट्य आहे. आपल्या देशात सध्या बीएसएनएल, जिओ किंवा एअरटेल वगैरे कंपन्या जी इंटरनेट वा ब्रॉडबँड सेवा देतात तीही उपग्रहामार्फतच आपल्यापर्यंत येते. पण ती थेट नसते. त्यासाठी ठिकठिकाणी मोबाईल टॉवर उभे करावे लागतात. आपण जेव्हा अलिबागवरून नागपूरला एखाद्याशी मोबाईलवर बोलतो तेव्हा आपल्या बोलण्याचा संदेश एका टॉवरवरून दुसऱ्या टॉवरकडे असा हस्तांतरीत करीत नागपूरपर्यंत पोचत असतो. हे टॉवर अर्थातच उपग्रहाशी जोडलेले असतात. स्टारलिंकच्या सेवेमध्ये टॉवरची जागा आकाशातले उपग्रह घेणार आहेत. आपला संदेश थेट उपग्रहाकडे जाईल.

यांच्या सेवेची गरज नाही

एरवी आपण सध्याच्या इंटरनेटसाठी जे भूस्थिर उपग्रह किंवा सॅटेलाईट वापरतो ते आकाशात हजारो किलोमीटर दूर अशा उंचीवर आहेत. मस्क यांनी यात बदल केला व पृथ्वीपासून अगदी नजीक, म्हणजे सुमारे पाचशे किलोमीटर उंचीपर्यंतच्या आकाशात असंख्य उपग्रह सोडले. अशा उपग्रहांची माळच दूर अंतरापर्यंत तयार झाली. म्हणूनच या कंपनीचे नाव स्टारलिंक आहे. स्टारलिंकच्या मार्फत उपलब्ध असणारे इंटरनेट हे थेट या उपग्रह माळेच्या साह्याने आपल्याला मिळेल. त्यामुळे ते अधिक स्पष्ट व जलद असेल तसेच अगदी दुर्गम भागांमध्येही हे इंटरनेट मिळू शकेल असा कंपनीचा दावा आहे. जगातील १६५ देशांमध्ये स्टारलिंकची अशी सेवा सुरू झाली आहे. असे असूनही भारत त्याला का विरोध करीत आहे असा मस्क यांचा सवाल आहे. या प्रश्नाचे उत्तर अगदी साधे आहे. एक म्हणजे सध्या भारतात जे इंटरनेट पुरवले जाते पुरेसे परवडणारे आहे. त्याचा दर्जा चांगला आहे. शिवाय जवळपास ९० टक्के लोकसंख्येपर्यंत ते आधीच पोचलेले आहे. अतिदुर्गम जंगले, पर्वतराजी किंवा काही ग्रामीण भाग अशांपर्यंतच या सेवा अजून गेलेल्या नाहीत. पण भारतातील सध्याच्या कंपन्याच त्या देऊ शकतात. त्यासाठी मस्क यांची महागडी सेवा घेण्याची गरज नाही. सध्या भारतात मध्यमवर्गीय घरात जे इंटरनेट सुमारे पाचशे ते आठशे रुपयात मिळू शकते ते घेण्यासाठी मस्क यांच्या कंपनीला आपल्याला ४ ते ५ हजार रुपये द्यावे लागतील. दुसरे म्हणजे ते मिळवण्यासाठी एक वेगळी डिश घ्यावी लागेल, जी उपग्रहाशी थेट जोडलेली असेल. तिचाच खर्च सुमारे ४० हजारांच्या घरात असेल. साहजिकच हा प्रकार सामान्य ग्राहकांसाठी नाही. पण मस्क यांच्या डोळ्यापुढे बहुदा हे सामान्य ग्राहक नसावेत. मोठ्या औद्योगिक कंपन्या, सरकारी यंत्रणा आणि लष्कर यांच्या गळ्यात ते मारण्याचाच त्याचा डाव असावा. भारताचा विस्तार व गरज लक्षात घेता ही गिऱ्हाईके मिळाली तर मोठा धंदा करता येईल असे मस्क यांना वाटणे साहजिक आहे. पण त्यात खर्चाखेरीजकरून बाकीचेही अनेक प्रश्न आहेत.

सुरक्षिततेचा प्रश्न

मुख्य प्रश्न हा सुरक्षिततेचा आहे. मस्कची कंपनी स्पेस एक्स ही मुळात अमेरिकी पैशावर मोठी झालेली कंपनी आहे. नासा या जगप्रसिध्द संस्थेची सरकारी मदत कमी होत गेली आणि मस्क यांच्या अवकाशात रॉकेटे आणि उपग्रह सोडण्याच्या प्रयोगांना तिथल्या सरकारने अनुदान मिळत गेले. त्यांच्या इलेक्ट्रिक मोटारींच्या धंद्यालाही अशाच अनुदानांचा फायदा झाला. पेट्रोल बचतीच्या नावाखाली या वाहनांना जशी आपल्याकडे प्रोत्साहनात्मक मदत दिली जाते तशीच ती पूर्वी अमेरिकेत दिली गेली व त्याचा फायदा त्यांनी उठवला. मुद्दा असा की, मस्क यांच्या कंपन्या आणि अमेरिकी सरकार यांच्यात फरक करणे कठीण आहे. ट्रम्प यांच्याशी भांडण झाले असले तरी अगदी आजही मस्क हे ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाला हजारो कोटी डॉलरच्या देणग्या देत असतात. त्या बदल्यात मस्क यांना जगभरात कंत्राटे मिळवून दिली जातात. रशियाने हल्ला केल्यानंतर युक्रेनमधील उपग्रह दळणवळण कोलमडले. त्यावेळी मस्कच्या स्टारलिंकने तिथे सेवा देण्यास सुरूवात केली. याचा उपयोग करूनच युक्रेनने रशियावर वारंवार अचूक असे ड्रोनचे हल्ले केले. पण ट्रम्प यांची मर्जी फिरली की मस्क यांच्या कंपनीची ही सेवा अचानक बंद करण्यात येते किंवा तिचा स्पीड कमी केला जातो. अगदी अलिकडे बारा ऑक्टोबरला असाच प्रकार झाला. यामुळे रशियाचे हल्ले रोखणे कठीण झाले व रशियावर हल्ले करणे अशक्य झाले. उद्या स्टारलिंकची सेवा आपल्या सरकारने किंवा लष्कराने घेतली आणि चीन किंवा पाकिस्तानसोबतच्या युध्दात ऐन वेळी ही सेवा अमेरिकी सरकारच्या आदेशावरून हळू केली गेली तर काय हाहाकार होईल याची कल्पना केलेली बरी. त्यामुळे मस्क यांच्या कोणत्याही दबावाला भारत सरकारने बळी पडता कामा नये. स्टारलिंक कंपनीच्या सेवेतून ग्राहकांचा जो डेटा तयार होईल तो भारतीय भूमीतील सर्व्हर्समध्येच साठवला गेला पाहिजे अशी भारत सरकारची अट आहे व ती अत्यंत योग्य आहे. पण मस्क त्याला तयार नाही हेही उल्लेखनीय आहे. आपल्या वित्तीय कंपन्या वा बँकांचा डेटा चुकीच्या रीतीने वापरला जाण्याचा किंवा त्यात छेडछाड होण्याचा पुरेपूर धोका आहे. मस्क यांचे आजवरचे उपद्व्याप पाहता ते काहीही करू शकतात. अंबानी, मित्तल किंवा अदानी यांच्या कंपन्याही धुतल्या तांदळासारख्या नाहीत. पण त्या किमान भारतीय आहेत. इथल्या कायदेकानूंनुसार त्यांना शिक्षा होऊ शकते. मस्कच्या बाबत ते शक्य होणार नाही. आज मोदी सरकारने मस्कच्या प्रवेशाला अडवून धरले आहे ही स्वागतार्ह बाब आहे. दुर्दैवाने या सरकारबाबत भविष्यातही अशीच हमी देता येईल याची खात्री नाही. अगली बार ट्रम्प सरकार असा नारा देऊन आलेले आपले महान नरेंद्र मोदी कोणत्याही क्षणी त्याच ट्रम्प यांच्या दबावाखाली येऊन मस्क यांच्या अटी मान्य करू शकतील. त्यावेळीही त्याला विरोधच करायला हवा.

विचार

घराघरांतील पुस्तकांतून शिक्षणाचा आणि माणुसकीचा नवा सेतू

विजयकुमार कट्टी

आपल्या समाजात अनेक चांगली माणसं आहेत. मदत करण्याची इच्छाही अनेकांच्या मनात असते. कुणाला गरजू विद्यार्थ्यांना मदत करायची असते, कुणाला पर्यावरणासाठी काहीतरी करायचं असतं, तर कुणाला समाजातील माणसांना एकत्र आणायचं असतं. पण अनेकदा आपण विचार करत राहतो. मोठा कार्यक्रम कसा करायचा, निधी कुठून आणायचा, कोणती संस्था पुढे येईल, प्रायोजक कोण मिळेल, याचाच विचार सुरू राहतो. आणि या सगळ्यात एक साधी, सहज करता येणारी कृती मागे पडते.

खरं तर समाजात बदल घडवण्यासाठी प्रत्येक वेळी मोठा निधी, मोठा गाजावाजा किंवा विक्रम करण्याची गरज नसते. कधी कधी आपल्या घरात पडून असलेली काही पुस्तकंही एखाद्या विद्यार्थ्याच्या आयुष्यात नवी वाट दाखवू शकतात. गरज असते ती फक्त ती पुस्तकं योग्य व्यक्तीपर्यंत पोहोचवण्याची आणि मनातल्या देण्याच्या इच्छेला कृतीची जोड देण्याची.

याच विचारातून 'नवरात्री रिसोर्स रिव्हायवल' हा उपक्रम आकाराला आला. त्यामागचा साधा विचार आहेविक्रम नको, नको... हवी फक्त माणसांच्या मनातली 'देण्याची ओढ'!

माझ्या घरातून सुरू झालेली गोष्ट

या उपक्रमाची पहिली छोटी चाचणी माझ्या स्वतःच्या घरातून झाली. गणेशोत्सवाच्या काळात मी घरातील आणि परिचितांकडील पुस्तकं गोळा करण्याचा प्रयत्न केला. त्यातून तब्बल ८०० पुस्तकं जमा झाली. ही संख्या म ाझ्यासाठी केवळ आकडा नव्हता. लोकांच्या घरात वापरात नसलेली पुस्तकं होती; पण ती दुसऱ्या कुणाच्या तरी उपयोगी पडू शकतात, याची जाणीव करून दिली तर लोक आनंदाने पुढे येऊ शकतात, हा विश्वास त्यातून मिळाला.

आपल्या घरात अनेकदा मुलांची शालेय पुस्तकं, संदर्भग्रंथ, गोष्टींची पुस्तकं आणि इतर वाचनसाहित्य कपाटात पडून असतं. मुलं पुढच्या वर्गात जातात, पुस्तकं मागे राहतात. काही पुस्तकं आपण पुन्हा वाचत नाही; पण ती निरुपयोगी होत नाहीत. उलट, योग्य विद्यार्थ्याच्या हातात गेली तर त्यांचं महत्त्व पुन्हा वाढतं.

म्हणूनच पुस्तकाकडे केवळ वस्तू म्हणून न पाहता, ज्ञानाची संधी म्हणून पाहण्याची गरज आहे. एखाद्या कुटुंबासाठी जुनं झालेलं पुस्तक दुसऱ्या कुटुंबातील मुलासाठी नवी सुरुवात ठरू शकतं. पुस्तकाला दुसरा वाचक मिळणं म्हणजे त्याच्या उपयोगी आयुष्याला नवी संधी मिळणं.

पुस्तक जुनं झालं, तरी त्याची किंमत संपत नाही!

आज शिक्षणाचा खर्च अनेक कुटुंबांसाठी चिंतेचा विषय आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला आवश्यक पुस्तकं आणि वाचनसाहित्य सहज मिळेलच, असं नाही. अशा वेळी समाजातील उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करणे महत्त्वाचे ठरते. 'नवरात्री रिसोर्स रिव्हायवल'चा उद्देश केवळ पुस्तकं गोळा करणे नाही. घराघरांत उपलब्ध असलेल्या संसाधनांचा पुनर्वापर, गरजू विद्यार्थ्यांपर्यंत शैक्षणिक साहित्य पोहोचवणे आणि समाजात परस्पर सहकार्याची भावना वाढवणे, हे या उपक्रमाचे महत्त्वाचे भाग आहेत.

यातून पर्यावरणाचाही विचार पुढे येतो. उपलब्ध पुस्तकांचा पुनर्वापर केल्यामुळे नवीन प्रतींची गरज काही प्रमाणात कमी होऊ शकते. मात्र, प्रत्यक्ष पर्यावरणीय लाभ किती झाला, हे मोजण्यासाठी जमा झालेली आणि पुन्हा वापरात आलेली पुस्तकं, त्यांचा प्रकार आणि वितरण यांची नोंद ठेवणं आवश्यक आहे. पर्यावरणासाठी काम करताना केवळ मोठे दावे करण्यापेक्षा प्रत्यक्ष कृती आणि तिचा परिणाम मोजणं अधिक महत्त्वाचं आहे.

या उपक्रमात सहभाग पूर्णपणे ऐच्छिक आहे. कोणावरही पुस्तकं देण्याची सक्ती नाही. प्रत्येकाने आपल्या इच्छेनुसार, आपल्या क्षमतेनुसार योगदान द्यावं, हाच याम ागचा विचार आहे.

एका चर्चेने मिळालेलं मोठं बळ

घरातून सुरू झालेल्या या छोट्या प्रयत्नाला व्यापक स्वरूप देण्यासाठी २८ सप्टेंबर २०२६ रोजी ठाणे जिल्हाधिकाऱ्यांकडे या उपक्रमाचा प्रस्ताव सादर करण्यात आला. या प्रस्तावातून समाजातील उपलब्ध पुस्तकांचा गरजू विद्यार्थ्यांसाठी उपयोग व्हावा आणि नागरिकांच्या सहभागातून शैक्षणिक मदतीची साखळी निर्माण व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. या प्रवासात ठाणे पोलीस आयुक्त श्री. आशुतोष डुंबरे यांच्याशी झालेली चर्चा महत्त्वाची ठरली. उपक्रमामागचा हेतू समजून घेण्यासाठी त्यांनी वेळ दिला. साधारण दहा मिनिटांच्या चर्चेत कल्पनेचा गाभा मांडता आला. त्यानंतर अवघ्या तीन दिवसांत संबंधित यंत्रणेकडून पुढाकार घेण्यास सुरुवात झाली. एखाद्या चांगल्या सामाजिक कल्पनेला योग्य वेळी मिळालेलं मार्गदर्शन आणि कृतीची जोड किती महत्त्वाची असते, याचा हा अनुभव होता.

ठाणे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा माहिती कार्यालयातील मनोज सानप आणि ठाणे पोलीस आयुक्तालयाकडून मिळालेल्या सहकार्यामुळे या उपक्रम ाला व्यापक पातळीवर नेण्याची दिशा मिळाली. पोलीस आयुक्तांनी जिल्ह्यातील ३५ पोलीस ठाण्यांच्या माध्यमातून आणि घराघरांतील सहभागातून हा विचार पुढे नेण्याबाबत मार्गदर्शन केले. या प्रक्रियेत ठाणे येथील डीसीपी बाळासाहेब पाटील, भिवंडी येथील डीसीपी पवन बनसोड, कल्याण येथील डीसीपी अतुल झेंडे, उल्हासनगर येथील डीसीपी सचिन गोरे आणि ठाणे येथील डीसीपी प्रशांत कदम यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांचे सहकार्य महत्त्वाचे आहे. कल्याणमधील विजय गायकवाड सर, जाधव सर आणि इतर संबंधित पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचाही या उपक्रमाच्या वाटचालीत सहभाग आहे. मला सर्वांत जास्त आनंद कशाचा झाला, माहीत आहे? डीसीपी असोत, एसीपी असोत, पीएसआय असोत किंवा पोलीस अंमलदारप्रत्येक स्तरावर या उपक्रमाला सहकार्य मिळालं. कुणीही याकडे केवळ दुसऱ्याचं काम म्हणून पाहिलं नाही. 'हा आपलाही उपक्रम आहे,' या भावनेने त्यांनी हातभार लावला.

माझ्यासाठी हा अनुभव पुस्तकं गोळा करण्याइतकाच महत्त्वाचा आहे. कारण एखादी चांगली कल्पना एका व्यक्तीची असू शकते; पण ती प्रत्यक्षात आणण्यासाठी अनेकांनी तिला आपली मानणं आवश्यक असतं. पद कोणतंही असो, जेव्हा माणसं एकाच उद्देशाने एकत्र येतात, तेव्हा कामाला खरी गती मिळते. या ठिकाणी एक गोष्ट आवर्जून सांगावीशी वाटते. पोलीस यंत्रणा म्हणजे केवळ कायदा-सुव्यवस्था राखणारी किंवा गुन्ह्यांचा तपास करणारी यंत्रणा, अशी आपली अनेकदा समजूत असते. पण सामान्य माणसाला गरज असताना मदतीचा हात देणारी, समाजातील सकारात्मक कामांना दिशा देणारी आणि नागरिकांशी विश्वासाचं नातं जोडणारी यंत्रणाही पोलिसांचीच आहे. या उपक्रमातून त्याचा अनुभव घेता आला.

डोंबिवलीतला अनुभव :
देण्याबरोबर शिकण्याचाही आनंद!

१७ ते २५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'नवरात्री रिसोर्स रिव्हायवल' उपक्रम राबवला जात आहे. या उपक्रमातील एक महत्त्वाचा अनुभव १८ ऑक्टोबर रोजी डोंबिवली (पूर्व) येथील नव राधेश्याम को-ऑपरेटिव्ह हाउसिंग सोसायटी लिमिटेडमध्ये आयोजित कार्यशाळेत मिळाला. सोसायटीतील रहिवासी आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधताना पुस्तकांच्या पुनर्वापराबाबत, शैक्षणिक गरजांबाबत आणि नागरिकांच्या सहभागाबाबत छान चर्चा झाली. लोकांच्या मनात या उपक्रमाविषयी असलेली उत्सुकता, त्यांनी मांडलेले विचार आणि विचारलेल्या प्रश्नांमधून मलाही काही नवे दृष्टिकोन मि ळाले. सामाजिक उपक्रम हा एकाच व्यक्तीने आखलेला आणि इतरांनी फक्त स्वीकारलेला कार्यक्रम नसतो. लोकांशी संवाद साधला की त्यातून नवे विचार जन्माला येतात आणि उपक्रम अधिक समृद्ध होतो. या सुंदर अनुभवासाठी डोंबिवली पोलीस ठाण्यातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे तसेच डीसीपी अतुल झेंडे यांचे मनापासून आभार. नागरिक आणि पोलीस यांच्यात सहकार्याचं नातं निर्माण होण्यासाठी अशा संवादात्मक उपक्रमांचा नक्कीच उपयोग होतो.

या उपक्रमात सर्वांत महत्त्वाचं आहे ते लोकांनी स्वतःहून पुढे येणं. पुस्तकं द्यायची असतील तर द्यावीत, उपक्रम समजून घ्यायचा असेल तर संवाद साधावा आणि शक्य असेल तिथे इतरांनाही सहभागी करून घ्यावं. कोणावरही दबाव न आणता लोकांच्या मनात विश्वास निर्माण करणं, हीच अशा उपक्रमाची खरी ताकद आहे.

नवरात्र वेगवेगळं, पण माणुसकीचा धागा एकच!

नवरात्र महाराष्ट्रात वेगवेगळ्या पद्धतीने साजरं केलं जातं. कुठे गरबा-दांडिया, कुठे देवीची आराधना, कुठे पारंपरिक धार्मिक कार्यक्रम, तर कुठे सामुदायिक उपक्रम. प्रत्येकाची पद्धत वेगळी असली, तरी माणसांना एकत्र आणण्याची ताकद या उत्सवात आहे. या उत्सवाच्या निमित्ताने आपण आपल्या आनंदात इतरांचाही वाटा जोडू शकतो का? आपल्या घरातील उपयोगात नसलेल्या पुस्तकांना नवा वाचक मिळवून देऊ शकतो का? आपल्या सोसायटीत, मित्रपरिवारात किंवा परिसरात छोटासा प्रयत्न सुरू करू शकतो का? असे प्रश्न स्वतःला विचारण्याची ही संधी आहे. यासाठी मोठी घोषणा करण्याची किंवा मोठा खर्च करण्याची गरज नाही. काही पुस्तकं, थोडा वेळ आणि मदत करण्याची मनापासून इच्छाइतक्यानेही सुरुवात होऊ शकते. महत्त्वाचं म्हणजे, मदत करणारा आणि मदत मिळवणारा यांच्यात सन्मानाचं नातं निर्माण व्हावं.

केवळ बोलू नका, एक छोटी कृती करून पाहा!

समाजात अनेक प्रश्न आहेत. बेरोजगारी, शिक्षणातील अडचणी, पर्यावरणाचा ऱ्हास आणि आर्थिक विषमता यांसारख्या समस्यांवर उपाय शोधण्यासाठी शासन, संस्था, उद्योग आणि नागरिक या सगळ्यांचा सहभाग आवश्यक आहे. निधी आणि संस्थात्मक मदत यांचंही महत्त्व आहे. परंतु प्रत्येक चांगल्या कामाची सुरुवात निधी मिळाल्यानंतरच झाली पाहिजे, असं नाही. आपल्या हातात जे आहे, त्यापासून सुरुवात करता येते. आपल्या घरातील पुस्तकं दुसऱ्या विद्यार्थ्यापर्यंत पोहोचवणं, शेजाऱ्यांना सहभागी होण्याचं आवाहन करणं किंवा आपल्या परिसरात पुस्तक संकलनाचा छोटा उपक्रम सुरू करणंहीदेखील सम ाजसेवेचीच कामं आहेत.

'नवरात्री रिसोर्स रिव्हायवल' हा त्याच विचाराचा एक प्रयत्न आहे. या उपक्रमातून किती पुस्तकं जमा होतील, किती विद्यार्थ्यांना त्यांचा उपयोग होईल, याची नोंद ठेवणं महत्त्वाचं आहेच. पण त्याचबरोबर किती लोकांनी पुढाकार घेतला, किती घरांनी संसाधनांचा पुनर्वापर केला आणि समाजात सहकार्याची भावना किती वाढली, हेही पाहायला हवं. शेवटी, समाजबदल हा केवळ घोषणांनी घडत नाही. तो घडतो माणसं एकमेकांसाठी उभी राहतात तेव्हा. म्हणून या नवरात्रीत विक्रम करण्याचा विचार नको आणि निधीची वाट पाहत बसण्याचीही गरज नको. आपल्या घरातून सुरुवात करूया. कारण खरी ताकद आहे ती माणसांच्या मनातल्या 'देण्याच्या ओढीत'!

चर्चा आजची

शेतकऱ्यांना आर्थिक बळाची प्रतीक्षा

प्रमोद जाधव

रायगड जिल्ह्यामध्ये पावसाअभावी भात पिक संकटात आले आहे. जमिनीतील ओलावा कमी झाल्याने कडधान्य लागवडही धोक्यात आली आहे. जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. भात पिकांच्या उत्पादनात यावर्षी साधारणपणे ५० टक्के घट होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यामुळे कडधान्य पिकांच्या उत्पादनावर ही परिणाम होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. कडधान्य पीक उत्पादक शेतकऱ्यांना उभारी देण्यासाठी कृषीविभागासह जिल्हा प्रशासनाने योग्य नियोजन करावे, अशी मागणी होत आहे. दरम्यान नैसर्गिक घटकांमुळे होणाऱ्या नुकसानीसाठी संरक्षण देण्यासाठी कृषी विभागाने आंबा, काजू, सुपारी, नारळ सुपारी या पिकाला विमा कवच देण्याचा प्रयत्न केला आहे. सरकारसह जिल्हा प्रशासनाने शेतकऱ्यांना आर्थिक बळ देण्यासाठी प्रयत्न केल्यास जिल्ह्यातील शेतकरी सक्षम होण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये भाताचे सरासरी क्षेत्र ८७ हजार ५३६ हेक्टर इतके आहे. यावर्षी २२जून पासून पावसाने सुरुवात केली. जून ते सप्टेंबर या कालावधीत ९० दिवस पावसाने हजेरी लावली. त्यामध्ये जूनमध्ये अकरा, जूलैमध्ये २५, ऑगस्टमध्ये ३१, सप्टेंबरमध्ये २३ दिवस पाऊस कोसळला. जिल्ह्यामध्ये प्रत्यक्ष दोन हजार ८९४.७ मी.मी. पाऊस पडला. जिल्ह्यात सरासरी तीन हजार तीन हजार १४८ मी. मी. पावसाची नोंद असते. मात्र मिळालेल्या आकडेवारीनुसार यावर्षी २५० मि. मी. पाऊस कमी पडला.जूलै महिन्यात सरासरी पेक्षा ५२.९ टक्के जास्त पाऊस झाला. ऑगस्ट महिन्यात कमी अधिक प्रमाणात पाऊस पडला. त्या कालावधीत सलग पावसाचा खंड झाला नाही. मात्र सप्टेंबर महिन्यात शेवटच्या आठवड्यापासून पावसाचा खंड आढळून आला. जिल्ह्यामध्ये भात पीक बहरण्याच्या अवस्थेत असताना पावसाने दडी मारली आहे. तापमानात वाढ होऊन हवामान उष्ण व कोरडे झाले आहे.

कित्येक दिवस पाऊस नसल्याने खाचरातील



पाण्याच्या अभावामुळे भातांची रोपे पिवळी पडू लागली आहेत. जमीनीतील ओलावा कमी होऊ लागला आहे. त्याचा परिणाम वेगवेगळ्या किड रोगांचा प्रादुर्भाव भात पिकांवर झाला आहे.अलिबागसह श्रीवर्धन, मुरूड, पेण, खालापूर, कर्जत, तळा, उरण, पोलादपूर, पाली, पनवेल, रोहा, माणगाव, म्हसळा, महाड, तालुक्यांतील भात पिकांच्या उत्पादनात २५ ते ८० टक्केपर्यंत घट होण्याची शक्यता कृषी विभागाने व्यक्त केली आहे. त्यामध्ये पोलादपूर,रोहा, तळा तालुक्यामध्ये ८० टक्के, पेण, अलिबाग, माणगांव, पालीमध्ये ४० टक्के, खालापूर, पनवेल, मुरूड, म्हसळा, कर्जतमध्ये २५ टक्के, महाडमध्ये ३० घट होण्याची शक्यता वर्तविली आहे. जिल्ह्यात भात पिकासह रब्बी हंगामात वाल, हरभरा आदी कडधान्य पिकांची लागवड कापणीनंतर केली जाणार आहे. मात्र यंदा पावसो लवकरच दडी मारल्याने जमीनीला भेगा पडू लागल्या आहेत. जमीनीतील ओलावा नष्ट झाल्याने रब्बी पिकांवर त्याचा परिणाम होण्याची भिती व्यक्त करण्यात आली आहे. कृषी विभागाकडून मिळणारे हरभरा व इतर कडधान्य बियाणांचा पुरवठाही उपलब्ध झाला नाही. त्यामुळे भात पिकांसह कडधान्य पिक उत्पादक शेतकऱ्यांना फटका बसण्याची भिती व्यक्त केली जात आहे. जिल्ह्यातील काही भागांमध्ये गेल्या काही दिवसांपासून कापणीसह भात झोडणीला सुरुवात झाली आहे. परंतु जमीनीत ओलावा नसल्याने कडधान्याची लागवड कशी करणार असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये भात पिकांबरोबरच फळ पिकांची लागवड करण्यावर मोठ्या प्रमाणात भर दिला जात आहे. आंबा, काजूसह नारळ, व सुपारीचे उत्पादन जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात घेतले जात आहे. भात पीकाला पर्यायी व्यवसाय म्हणून फळपिक लागवडीकडे पाहिले जाते. जिल्ह्यात उत्पादनक्षम आंब्याचे क्षेत्र १२ हजार ९५२ हेक्टर इतके असून काजूचे क्षेत्र दोन हजार ३९६ हेक्टर, नारळाचे क्षेत्र ८६३.२० हेक्टर आणि सुपारीचे क्षेत्र एक हजार २४८ हेक्टर इतके आहे. जिल्ह्यामध्ये फळ पिकांचे क्षेत्र दिवसेंदिवस वाढत आहे. तरुण वर्गांसह मध्यम वर्गातील शेतकरी फळ पीक लागवड करीत असतात. कृषी विभागाकडून त्यांना मार्गदर्शन केले जाते. मात्र बदलत्या हवामानामुळे हातातोंडाशी आलेला घास जाण्याची भिती कायमच असते. अवकाळी पाऊ, जास्त तापमान अशा अनेक बदलत्या वातावरणामुळे फळ पिकांच्या उत्पादनावर त्याचा परिणाम होतो.

काजू फळपीकासाठी विम्याचा हप्ता दर प्रती हेक्टरी चार हजार ८०० रुपये निश्चित करण्यात आला असून विमा संरक्षण एक लाख वीस हजार रुपये इतके आहे. आंबा फळपीकासाठी विम्याचा हप्ता दर प्रती हेक्टरी आता आठ हजार ५०० रुपये करण्यात आला आहे. एक लाख ७० हजार रुपये विमा संरक्षण आहे. नारळ पिकासाठी प्रति हेक्टरी विमा हप्ता सहा हजार ८०० रुपये असून विमा संरक्षीत रक्कम एक लाख ७० रुपये असणार आहे. सुपारी पिकासाठी एक लाख रुपयांचा विमा संरक्षण आहे. त्यासाठी प्रति हेक्टरी चार हजार विमा हप्ता असणार आहे. अंबिया बहारासाठी योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी विमा पोर्टल दोन ऑक्टोबरपासून सुरु करण्यात आले आहे. यातून शेतकऱ्यांना विमा कवच मिळण्याची शक्यता आहे. मात्र भात पिकासह कडधान्य उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक बळाची गरज असून सरकारसह जिल्हा प्रशासनाने याबाबत दखल घ्यावी अशी मागणी होत आहे.

लोकसंसद

आता पालकांची खरी कसोटी

मुलांना इंटरनेट वापरण्यापासून पूर्णपणे रोखता येणार नाही. इंटरनेटचा वापर हा मूलभूत अधिकार असून, मुलांनाही तो लागू होतो, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले आहे. भारतीय संविधानातील अनुच्छेद २१ आणि अनुच्छेद १९(१)(अ) यांचा संदर्भ देत न्यायालयाने मुलांच्या इंटरनेट वापरण्याच्या अधिकारावर भर दिला. त्याचवेळी मुलांच्या ऑनलाइन सुरक्षेसाठी योग्य निर्बंध आणि संरक्षणात्मक उपाय आवश्यक असल्याचेही स्पष्ट केले. मुलांच्या इंटरनेट वापरावर सरसकट बंदी घालणे हा परिणामकारक उपाय असल्याचे ठोस पुरावे उपलब्ध नाहीत. अशा निर्बंधांमुळे मुलांची सुरक्षितता हमखास वाढते, हे अद्याप ठोसपणे सिद्ध झालेले नाही. त्यामुळे मुलांना डिजिटल जगापासून पूर्णपणे दूर ठेवण्याऐवजी त्यांना सुरक्षित आणि जबाबदारीने इंटरनेट वापरण्यास शिकवणे अधिक महत्त्वाचे आहे. समाजमाध्यमांचा वापर करताना पालकांची संमती, मार्गदर्शन आणि देखरेख यांना महत्त्व देण्याची भूमिका न्यायालयाने मांडली आहे. सोशल मीडियापासून मुलांना पूर्णपणे दूर ठेवल्याने ऑनलाइन अत्याचारांच्या घटना कमी होतील, असे ठामपणे सांगता येत नाही. त्यामुळे मुलांच्या इंटरनेट किंवा मोबाईल वापरावर केवळ बंदी घालण्याऐवजी पालकांनी अधिक प्रभावी आणि कल्पक उपायांचा विचार करणे आवश्यक आहे. मुलांच्या दैनंदिन जीवनात मैदानी खेळ, वाचन, छंदवर्ग, सांस्कृतिक उपक्रम आणि मित्रमैत्रिणींसोबत प्रत्यक्ष संवाद यांना प्रोत्साहन द्यायला हवे. मुलांना इंटरनेटपासून दूर ठेवण्यापेक्षा त्यांना डिजिटल जगात सुरक्षितपणे वावरण्यास सक्षम करणे आता खरी पालकांची कसोटी आहे.

- दत्तप्रसाद शिरोडकर, मुंबई

दिनविशेष

दसऱ्यानिमित्त आपल्यातील दोषांचे सीमोल्लंघन करूया!

दसरा सण मोठा, नाही आनंदाचा तोटा हे लहानपणापासून आपल्या मनावर बिंबवण्यात आले आहे आणि ते खरंही आहे. दसरा अर्थात विजयादशमीला आपल्या भारतीय संस्कृतीत विशेष महत्व आहे. हा दिवस मांगल्याचा, पावित्र्याचा आणि विजयाचा दिवस म्हणून सहस्रो वर्षांपासून साजरा केला जात आहे. हा उत्सव प्रभू श्रीरामांनी रावणावर मिळविलेल्या विजयाची आठवण करून देतो तसेच दुर्गामातेने महिषासुराचा वध करून केलेल्या दुष्ट प्रवृत्तींचा विनाशाचीही आठवणही करून देतो. या दोन्ही कथांमधून मिळणार संदेश एकच आहे आणि तो म्हणजे कितीही साम र्थ्यशाली असली, तरी वाईट प्रवृत्तीचा शेवटी पराभव होतो आणि सत्य, धर्म आणि सदाचार यांचा विजय होतो. या दिवशी सोने म्हणून आपट्याची पाने लुटून ती परिवाराला आणि मित्रमंडळींना वाटणे तसेच शस्त्रपूजन करण्याचा प्रघात आहे. दसऱ्याच्या दिवशी सीमोल्लंघन करण्याची परंपरा आहे. पूर्वी राजे-महाराजे या दिवशी आपल्या राज्याच्या सीमा ओलांडून मोहिमेवर जात असत. काळाच्या ओघात या परंपरेला धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले. विजयाचे प्रतीक म्हणून या दिवशी दाराला तोरण बांधले जाते. प्रतीकात्मक रावणाचे दहन केले जाते तसेच आनंदोत्सव म्हणून घरी गोडधोड बनवले जाते. दुष्प्रवृत्तीचा नाश करण्याची शिकवण दसरा आपल्याला देतो. दसरा साजरा करताना त्यामागील भावार्थही आपण समजून घ्यायला हवा. प्रभू श्रीरामचंद्रांनी रावणाचा केलेला वध असो वा महिषासुरमर्दिनीने म हिषासुराचे केलेले पतन असो या दोन्ही घटना आपल्याला दुष्प्रवृत्तीचा विनाश करण्याचीच शिकवण देतात. या दोन्ही असुरांत असलेल्या दुष्प्रवृत्ती काहीअंशी आपल्यातही आहेत ज्यांना स्वभावदोष म्हणतात. स्वभावाला औषध नाही असे म्हटले जाते; मात्र ते अर्धसत्य असून मनाचा निर्धार आणि सोबत प्रार्थनेची जोड असेल, तर आपल्यातील स्वभावदोषांवर मातही करता येते. स्वभावातील घातक दोष एका व्यक्तींसह त्याच्या कुटुंबाचाही विनाश करण्यास कारणीभूत ठरू शकतात. आपल्यातील भीती, न्यूनगंड, आत्मविश्वासाचा अभाव यांसारखे दोष आपल्या प्रगतीत अडथळा निर्माण करतात. आपल्यातील आळस, अव्यवस्थितपणा, चालढकलपणा आपल्या व्यक्तिमत्वावर गंभीर परिणाम करतात. इतरांचा विचार नसणे, स्वतःला श्रेष्ठ समजणे, आपलेच म्हणणे खरे करणे यांसारखे अहंकाराचे पैलू आपल्याला नातेवाईकांसह समाजापासूनही दूर करतात. आपल्यातील ईर्षा, मत्सर, द्वेष आपल्या आरोग्यावर गंभीर परिणाम करतात. आपल्यातील स्वार्थ आपल्याला भ्रष्टाचार, अनाचार करण्यास भाग पाडतो. असे एक ना अनेक दोष आपल्या मनात वर्षोनुवर्षे घर करून असतात. जीवनात घडणाऱ्या प्रसंगानुरूप ते उफाळून येतात आणि आपल्याला चुकिचे निर्णय घेण्यास भाग पाडतात. आपल्यातील दोषांचे पोषण करून आणि अहंकाराला खतपाणी घालून आपणच आपल्या सीमा मर्यादित केल्या आहेत. यंदाच्या दसऱ्याला आपणही सीमोल्लंघन करूया. आपल्यातील दोषांचे आणि अहंकाराचे निर्मूलन करण्याचा संकल्प करूया! इतरांमधील दोष पाहण्याची सवय सोडून देऊन इतरांतील गुण हेरुया आणि ते आपल्यात आत्मसात करण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करूया. त्यासाठी भगवंताला प्रार्थना करूया. सर्वगुणसंपन्न केवळ भगवंत आहे. आपल्यातील दोषांचे निर्दालन करून गुणांचे संवर्धन करण्यासाठी केलेले प्रयत्न म्हणजे एकप्रकारे भगवंताच्या समीप जाण्यासाठी केलेला प्रयत्नच होय, त्यामुळे या कार्यात भगवंत नक्कीच मदत करेल! चला तर मग दसऱ्याच्या शुभदिनी हाच संकल्प करून यंदाचा दसरा खऱ्या अर्थाने आनंदी करूया !

- जगन घाणेकर, मुंबई

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२० ऑक्टोबर

१) श्रीम. मेघना जीवन कुळकर्णी अलिबाग, २०-१०-१९४२
२) श्री. नारायण महादेव कुंटे अलिबाग, २०-१०-१९४५
३) श्रीम. स्नेहल श्रीनिवास जोशी अलिबाग, २०-१०-१९५१
४) श्रीम. प्रियवंदा प्रमोद सुर्वे चेंढरे, अलिबाग, २०-१०-१९५५
५) श्री. अशोक राजाराम राऊत अलिबाग, २०-१०-१९५४
६) श्री. अशोक पांडुरंग जाधव अलिबाग, २०-१०-१९४८

कृषीवलच्या वाचकांना आवाहन



अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक,कृषीवल


सुका कचरा केंद्रांचा होणार कायापालट

● रिसोर्स रिकव्हरी केंद्रांसाठी मुंबई महानगरपालिकेचा पुढाकार

। मुंबई । प्रतिनिधी ।

मुंबईतील सुका कचरा वर्गीकरण केंद्रांचे आधुनिकीकरण करून त्यांचे अत्याधुनिक संसाधन पुनर्प्राप्ती केंद्रांमध्ये रूपांतर करण्यासाठी महापालिकेने हालचाली सुरू केल्या आहेत. या प्रकल्पासाठी २३.३८ कोटी रुपये एवढा अंदाजित खर्च आहे. त्यासाठी राईट्स लिमिटेड या संस्थेची तांत्रिक सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली असून त्यासाठी ९२ लाख ५७ हजार १८५ रुपये खर्च अपेक्षित आहे. या नियुक्तीला आणि कंत्राट कराराला मंजुरी देण्याचा प्रस्ताव महापालिकेच्या स्थायी समितीसमोर मांडण्यात येणार आहे.

मुंबईत दररोज सुमारे सहा हजार ५०० ते सात हजार मेट्रिक टन घनकचरा संकलित करून



त्याची वाहतूक केली जाते. यापैकी ३० ते ४० टक्के कचरा सुका असून त्यात प्लॅस्टिक, कागद आणि पुनर्वापरयोग्य साहित्याचा समावेश असतो. या कचऱ्याचे प्रभावी वर्गीकरण आणि पुनर्वापर करण्यासाठी महापालिका क्षेत्रातील पाच ठिकाणी असलेल्या सुका कचरा वर्गीकरण केंद्रांचे आधुनिकीकरण करण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे कचरा वर्गीकरण आणि पुनर्वापराच्या प्रक्रियेला चालना मिळेल.

महापालिकेने यापूर्वी २७ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या स्थायी समिती ठरावानुसार टंडन अर्बन सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, केपीएम जी ऍडव्हायजरी सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड आणि राईट्स लिमिटेड या तीन संस्थांची पाच वर्षांसाठी सल्लागार म्हणून सूचीबद्धता केली होती. त्यानंतर ११ जून २०२५ रोजी अतिरिक्त आयुक्तांच्या अध्यक्षतेखालील तांत्रिक सल्लागार समितीसमोर या तीनही संस्थांनी सादरीकरण केले.

कचरा वेचकांना रोजगाराची संधी

सध्याच्या वर्गीकरण केंद्रांमधील मर्यादा लक्षात घेऊन पालिकेने पाच महत्वाच्या ठिकाणच्या कार्यक्षम यंत्रसामग्री आणि स्वच्छ कार्यपद्धती अमलात आणून जास्तीत जास्त साहित्य पुनर्वापरासाठी वेगळे केले जाणार आहे. यामुळे डम्पिंग ग्राऊंडवर जाणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटण्यास मदत होणार आहे. याशिवाय, पुनर्वापर साखळी अधिक बळकट होऊन असंघटित क्षेत्रातील कचरा वेचकांना रोजगाराची संधीही निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

९२ लाखांचे सल्लागार शुल्क

या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराने तयार केलेल्या अंतिम अंदाजपत्रकानुसार २३ कोटी ३७ लाख ७६ हजार ७३३ रुपये खर्च अपेक्षित आहे. राईट्स लिमिटेडचे सल्लागार शुल्क आणि अंमलबजावणीच्या कामासाठीचे शुल्क मिळून एकूण ९२ लाख ५७ हजार रुपये देण्याचा प्रस्ताव आहे.



भाएसो विद्यासंकुलात गरबा उत्सव

। नागोठणे । प्रतिनिधी ।

नागोठण्यातील भारतीय एज्युकेशन सोसायटीच्या वेलशेत येथील विद्यासंकुलात नवरात्रोत्सवानिमित्त भव्य महाआरती व गरबा उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन व महाआरतीने झाली. यावेळी डिप्लोमा इंजिनिअरिंग आणि फार्मसी विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दुपारच्या सत्रात पारंपरिक गरबा उत्सवाचे आयोजन करण्यात आले. या उत्सवामध्ये विद्यार्थ्यांसाठी गरबा स्पर्धा आणि रील स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. यामध्ये सर्व विभागांतील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभागी होत आपल्या नृत्यकौशल्याचे व सर्जनशीलतेचे प्रदर्शन केले. पारंपरिक वेशभूषा, तालबद्ध गरबा आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण विद्या संकुलात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. गरबा स्पर्धेमध्ये ओम मोकल (इलेक्ट्रिकल विभाग) याने विजेतेपद पटकावले, तर नियती गावंड (आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग विभाग) हिने गरबा क्वीन हा सन्मान मिळविला.

'आयुर्वेद चिकित्सकांनी अद्ययावत राहणे आवश्यक'



■ (छायाचित्र : संजय गायकवाड)

। कर्जत । प्रतिनिधी ।

आयुर्वेद व्यासपीठ रायगड, कर्जत आणि आयुर्वेद महाविद्यालय व संशोधन केंद्र, चांदई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'वैद्य भा.वि. साठ्ये स्मृती व्याख्यानमाला क्रमांक ४', त्रैमासिक रुग्ण चर्चासत्र उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात आयुर्वेद चिकित्सकांनी कायद्याच्या दृष्टीने अद्ययावत राहण्याची आवश्यकता तसेच संततीप्राप्तीच्या उपचारांमध्ये आयुर्वेदिक पंचकर्माचे महत्व या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमाला वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर, आयुर्वेद चिकित्सक, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी आयुर्वेद व्यासपीठ, रायगडचे अध्यक्ष वैद्य डॉ.निशिगंध आठवले यांनी प्रास्ताविकातून स्मृती व्याख्यानमालेची संकल्पना, उद्दिष्टे आणि आयुर्वेद व्यासपीठाच्या कार्याची दिशा स्पष्ट केली. प्राचार्य डॉ. मनीषा दुनघव यांनी उद्घाटनपर मनोगतात आयुर्वेद शिक्षणामध्ये शास्त्रीय ज्ञान, चिकित्सकीय जिज्ञासा आणि प्रत्यक्ष अनुभव यांची सांगड घालण्याचे महत्व अधोरेखित केले. महाविद्यालयाच्या वतीने अशा ज्ञानवर्धक उपक्रमांना सहकार्य करण्यात येत असल्याचेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमातील मार्गदर्शनात डॉ. किरण पंडित यांनी आयुर्वेद चिकित्सकांना वैद्यकीय व्यवसायाशी संबंधित कायदे, नियम आणि बदलत्या कायदेशीर तरतुदींची माहिती अद्ययावत ठेवणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. डॉ. अविनाश देवरे यांनी संततीप्राप्तीसाठी केल्या जाणाऱ्या उपचारांमध्ये आयुर्वेदिक पंचकर्माची भूमिका आणि त्याचे महत्व स्पष्ट केले. तर विविध आजार, त्यांची रोगनिर्मिती प्रक्रिया आणि उपचारपद्धती यांवर पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट केस प्रेझेंटेशन सादर केले.

निवडक



नवरात्रोत्सवात जलसंवर्धनाचा जागर

तळा : वरळ गावातील मुंबईकर युवकांनी यंदा नवरात्रोत्सवात एक वेगळाच आदर्श घालून दिला आहे. दरवर्षी भंडाऱ्याचे आयोजन करणाऱ्या या युवकांनी यंदा पावसाचे प्रमाण कमी झाल्याने भविष्यातील पाणीटंचाई ओळखून श्रमदानातून वनराई बंधारा उभारला आहे. वरळ येथे दरवर्षीप्रमाणे आई वाघेश्वरी नवरात्रोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. मात्र, केवळ धार्मिक उत्सवापुरते न थांबता गावाशी असलेली नाळ जपत वरळकर युवकांनी सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले. युवकांच्या संकल्पनेतून आणि स्वतःच्या श्रमदानातून हा बंधारा बांधण्यात आला. या वनराई बंधाऱ्यामुळे पावसाचे आणि नदीचे वाहून जाणारे पाणी अडवले जाणार असून भूजल पातळी वाढण्यास मोठी मदत होणार आहे. त्यामुळे येणाऱ्या उन्हाळ्यात गावाला भेडसावणाऱ्या पाणीटंचाईवर मात करणे शक्य होणार आहे. 'गावचा उत्सव, गावचे पाणी आणि गावचे भविष्य' या भावनेतून राबवलेला हा उपक्रम केवळ धार्मिक परंपरा जपणारा नसून पर्यावरण संवर्धन आणि जलसंधारणाची जबाबदारीही अधोरेखित करणारा आहे. मुंबईत राहूनही गावाच्या विकासासाठी धडपडणाऱ्या वरळकर युवकांचा हा स्तुत्य उपक्रम इतर गावांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.



डॉ.जी.आर.राजे.स्कूलमध्ये नवरात्रोत्सव

सुतारवाडी : लक्ष्मी गोविंद एज्युकेशनल अँड वेल हेअर ट्रस्टचे डॉ. जी.आर.राजे. प्री प्रायमरी इंग्लिश मीडियम स्कूल सुतारवाडी येथे लहान मुला-मुलींनी नवरात्रोत्सव उत्साही वातावरणात साजरा केला. यावेळी प्रत्येकाने आपल्या वहीच्या पानावर सरस्वतीचे चित्र काढले होते. सरस्वती पूजनानंतर पारंपारिक पद्धतीने गरबा नृत्याचा कार्यक्रम पार पाडला. यावेळी प्लेग्रुपपासून सीनियरचे विद्यार्थी सहभागी झाले होते. शिक्षिका कविता भालेराव आणि शितल सानप तसेच मावशी सानिका मोरे यांनी यावेळी विशेष मेहनत घेऊन गरबा नृत्याचा कार्यक्रम यशस्वी पार पाडला. सुरुवातीला स्कूलचे मुख्याध्यापक हरिचंद्र महाडिक यांच्या हस्ते सरस्वतीचे पूजन करण्यात आले. शेवटी मुलांना खाऊ देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

तळा बाजारपेठ फुलांच्या सुगंधाने दरवळली

तळा : दसरा सणानिमित्त तळा बाजारपेठेत झेंडूच्या फुलांची मोठ्या प्रमाणात आवक झाली आहे. सणासाठी लागणाऱ्या फुलांची मागणी वाढल्याने बाजारपेठेत ठिकठिकाणी फुलांचे स्टॉल लागले असून बाजार फुलांच्या सुगंधाने दरवळला आहे. दसऱ्याला झेंडूच्या माळा, तोरण आणि हाराला विशेष महत्व असते. वाहनांना, दुकानांना आणि घरांना तोरण बांधण्यासाठी तसेच आपट्याच्या



पानांसोबत झेंडूची फुले खरेदी करण्यासाठी नागरिकांची गर्दी पाहायला मिळत आहे. स्थानिक शेतकऱ्यांसह बाहेरून आलेल्या विक्रेत्यांनीही मोठ्या प्रमाणावर फुले विक्रीस आणली आहेत. यंदा पावसाच्या लहरीपणामुळे फुलांचे थोडे नुकसान झाले असले तरी आवक चांगली आहे. सध्या किरकोळ बाजारात झेंडूच्या फुलांना ७० ते १०० रुपये किलो दर मिळत असून हार २० ते ५० रुपयांना विकले जात आहेत. मागणी वाढल्याने दरात थोडी वाढ झाल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. दसऱ्याच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण असून फूल विक्रेत्यांमध्येही समाधानाचे चित्र आहे.

पान ३ वरुन

गोकुळमध्ये शेकापचा झंझावात

प्राप्त झाले आहे. कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाच्या (गोकुळ) निवडणुकीत शेकाप सरचिटणीस जयंत पाटील व काँग्रेसचे आ.सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीने जोरदार मुसंडी मारत १३ जागांवर विजय मिळविला. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्री, खासदार आणि आमदारांच्या ताकदीच्या जोरावर मैदानात उतरलेल्या महायुतीला जोरदार धक्का देत आघाडीने सहकार क्षेत्रात झेंडा रोवला. गोकुळच्या निवडणुकीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले होते. दूध संघावरील वर्चस्वासाठी महायुती आणि समविचारी आघाडी यांच्यात चुरशीची लढत झाली. मतदानात तब्बल ९९.९६ टक्के मतदानाची नोंद झाली होती. त्यामुळे निकालाबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली होती. अखेर समविचारी आघाडीने १३ जागा जिंकत स्पष्ट बहुमत मिळविले, तर महायुतीला बारा जागांवर समाधाना मानावे लागले.

गोकुळची निवडणूक म्हणजे केवळ दूध संघाच्या सत्तेची लढाई नव्हे, तर सहकार क्षेत्रातील राजकीय वर्चस्वाची कसोटी होती. या निवडणुकीत विविध राजकीय आघाड्यांमध्ये चुरस पाहायला मिळाली. शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील व काँग्रेसचे आ. सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील आघाडीच्या हालचालींकडेही सर्वांचे लक्ष लागले होते. या पार्श्वभूमीवर बाबासाहेब देरेकर यांच्या विजयाची चर्चा शेकापच्या दृष्टीने महत्त्वाची ठरत आहे.

महायुतीकडून शपथ, धार्मिक खेळ

गोकुळच्या निवडणुकीत सत्ताधारी राजकीय शक्ती आणि समविचारी आघाडी यांच्यात अटीतटीची लढत झाली. या लढतीत समविचारी आघाडीने मिळविलेल्या यशामुळे सहकार क्षेत्रातील स्थानिक नेतृत्वाचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले आहे. दूध उत्पादक सभासदांचा विश्वास संपादन करण्यासाठी महायुतीच्या नेत्यांनी ठरावधारकांना शेवटच्या टप्प्यापर्यंत धमकावण्याचा प्रयत्न केला होता. इतकेच नव्हे तर त्यांना यल्लामा देवीच्या परडी, भंडारावर हात मारून त्यांना आम्हालाच मतदान करा, आम्हाला मतदान नाही केलं तर देवीचा कोप होईल. इतकेच नव्हे तर बाळूमामाची शपथ मोडल्यास ब्रेनस्ट्रोक होईल, इतक्यापर्यंत धमकावण्याचे प्रयत्न महायुतीच्या नेत्यांकडून झाले होते. मात्र, गोकुळ हा दूध उत्पादकांचाच असल्याचा आज गोकुळच्या दूध उत्पादकांनी आपल्या मतदानातून दाखवून दिल्याची चर्चा सुरू झाली आहे.

प्रस्थापितांना शेकापचा राजकीय संदेश

सहकार क्षेत्रातील राजकारणात स्थानिक नेतृत्व, कार्यकर्त्यांचे जाळे आणि दूध उत्पादकांशी असलेला संपर्क यांना मोठे महत्त्व असते. अशा परिस्थितीत शेकापच्या बाबासाहेब देवकर यांनी मताधिक्याने विजय मिळविल्याने शेकापने कृतीतून प्रस्थापितांना चांगलाच धडा शिकविल्याचे दिसून आले. लाल बावटा हा संघर्षाचा, कष्टकऱ्यांच्या हक्कांचा आणि सामाजिक न्यायाचा प्रतीकात्मक आवाज आहे. गोकुळमधील या विजयाच्या पार्श्वभूमीवर शेकापची भूमिका सहकार क्षेत्रात अधिक ठळक झाली आहे. गोकुळच्या आखाड्यातील ही घडामोड शेकापच्या कार्यकर्त्यांसाठी उत्साहवर्धक ठरत आहे.

गोकुळमध्ये दूध उत्पादकांच्या हिताचे निर्णय होतील

सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखाली गोकुळच्या कारभारात भविष्यात अनेक सुधारणा होतील आणि दूध उत्पादकांच्या हिताचे निर्णय घेतले जातील, असा विश्वास आहे. सहकारी संस्थेचे यश हे केवळ आर्थिक उलाढालीवर मोजता येत नाही. त्या संस्थेशी जोडलेल्या दूध उत्पादकांना किती लाभ मिळतो, त्यांच्या प्रश्नांना किती प्राधान्य दिले जाते आणि संस्थेच्या कारभारात त्यांचा विश्वास किती टिकून राहतो, यावर तिचे खरे यश अवलंबून असते. गोकुळच्या नव्या नेतृत्वाने याच दृष्टिकोनातून काम करावे, अशी अपेक्षाही या निमित्ताने व्यक्त होत आहे.

उमेदवार जाहीर करतानाच अध्यक्षपदाचा निर्णय

गोकुळच्या निवडणुकीतील आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे उमेदवारांची घोषणा करण्यात आली, त्याच दिवशी अध्यक्ष कोण होणार, याबाबतही निर्णय जाहीर करण्यात आला होता. ज्या कुटुंबाने गोकुळ दूध संघाच्या स्थापनेत महत्त्वाची भूमिका बजावली, त्याच कुटुंबातील व्यक्तीला अध्यक्ष करण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला होता, असे जयंत पाटील यांनी सांगितले. शशिकांत चुयेकर यांच्या कुटुंबीयांनी गोकुळ दूध संघ उभारण्यासाठी आणि वाढविण्यासाठी मोलाचे योगदान दिले आहे. संस्थेच्या जडणघडणीत योगदान देणाऱ्या व्यक्तींच्या कार्याची दखल घेणे महत्त्वाचे आहे. सहकार क्षेत्रात संस्था उभी करण्यासाठी अनेक वर्षांचे परिश्रम, दूरदृष्टी आणि सभासदांचा विश्वास आवश्यक असतो. त्यामुळे संस्थेच्या उभारणीत योगदान देणाऱ्या कुटुंबाचा सन्मान राखण्याचा निर्णय महत्त्वाचा असल्याचे जयंत पाटील यांनी स्पष्ट केले.

सहकारात राजकारणापेक्षा सभासदांचे हित महत्त्वाचे

गोकुळ दूध संघाचा कारभार हा दूध उत्पादकांच्या हिताभोवती केंद्रित राहणे आवश्यक आहे. दूध उत्पादकांना योग्य दर मिळणे, उत्पादन खर्चाच्या तुलनेत त्यांना आर्थिक लाभ मिळणे, संकलन व वितरण व्यवस्थेत सुधारणा करणे आणि संस्थेच्या कामकाजात पारदर्शकता राखणे ही महत्त्वाची आव्हाने आहेत. राजकीय पक्ष आणि आघाड्यांमध्ये निवडणुकीच्या काळात संघर्ष होत असला, तरी निवडणुकीनंतर सहकारी संस्थेच्या माध्यमातून दूध उत्पादकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणे हीच खरी जबाबदारी आहे. गोकुळच्या नव्या नेतृत्वाने या जबाबदारीची जाणीव ठेवून निर्णय घ्यावेत, अशी अपेक्षा आहे.

हरिहरेश्वर गावामध्ये मगरीचा थरार

आणि वनविभागाच्या तत्परतेमुळे एक मोठा अनर्थ टळला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मध्यरात्री सुमारे १ वाजता हरिहरेश्वर येथील एका हॉटेलजवळ मगर फिरत असल्याची माहिती मिळताच, क्षणाचाही विलंब न लावता हरिहरेश्वरचे जागृत रहिवाशी सचिन गुरव, पप्पू टाकले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. ही मगर अंधाराचा फायदा घेऊन कुठेतरी निघून जाण्याची किंवा नागरिकांवर हल्ला करण्याची शक्यता होती. त्यामुळे या धाडसी तरुणांनी कोणतीही भीती न बाळगता अत्यंत संयमाने व सतर्कतेने त्या मगरीवर सतत लक्ष ठेवून पहारा दिला. तसेच, तात्काळ याची माहिती वनविभाग आणि स्थानिक सर्पमित्रांना दिली. माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी आणि सर्पमित्र क्षणाचाही विलंब न करता अवघ्या काही वेळात घटनास्थळी दाखल झाले. या धाडसी रेस्क्यू ऑपरेशनमध्ये वनविभागाचे अधिकारी नागरगोजे, ननावरे, वाहनचालक केळसकर यांच्यासह सर्पमित्र व वन्यजीव रक्षक गणेश कुडगावकर आणि सुजल खेराडे यांनी सहभाग घेतला. या सर्व टीमने स्थानिक ग्रामस्थांच्या साथीने मध्यरात्री २ वाजण्याच्या सुमारास अत्यंत धोकादायक परिस्थितीत मोकळ्या जागेवर रेस्क्यू ऑपरेशन राबवले. मगरीचा आकार मोठा आणि ताकद जास्त असल्यामुळे तिला पकडणे मोठे आव्हानात्मक होते. मात्र, सर्वांनी मिळून मोठ्या प्रयत्नांची पराकाष्ठा करत, सुरक्षेचे सर्व नियम पाळून त्या पूर्ण वाढ झालेल्या व सुदृढ मगरीस कोणतीही दुखापत न पोहोचवता अत्यंत शिताफीने जेरबंद केले. त्यानंतर तिला त्वरित तिच्या सुरक्षित नैसर्गिक अधिवासात सुखरूप मुक्त केले.

खैर तस्करी प्रकरणावर वनविभागाचा गोलमाल ?

(शरदचंद्र पवार) पक्षाने याप्रकरणी आक्रमक भूमिका घेत वनविभागाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, संशयित अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, म्हसळा येथे १४ ऑक्टोबर रोजी रात्रीच्या सुमारास वनविभागाच्या पथकाने आंबेद-महाड रस्त्यावर एका वाहनावर धडक कारवाई केली. या कारवाईत खैर सोलिप नग आणि खैर सोलिप किटा जप्त करण्यात आले होते. परंतु, वनविभागाने जारी केलेल्या अधिकृत प्रेस नोटमधील आकडेवारी डोळे दीपवणारी आहे. तब्बल २६२ नग खैर लाकूड जप्त करूनही त्याचे मोजमाप केवळ २.२४१ घनमीटर दाखवण्यात आले आहे. लाखो रुपयांची बाजारातील किंमत असताना, या संपूर्ण खैराच्या लाकडाची किंमत केवळ १२ हजार ६८२ रुपये (१०,५९८ + २,०८४) एवढी नगण्य दाखवण्यात आली आहे. या संशयास्पद कारभारावर ताशेरे ओढत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे रायगड जिल्हा संघटक तथा श्रीवर्धन विधानसभा अध्यक्ष अझहर धनसे यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. त्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून थेट सवाल केला आहे की, ''बाजारपेठेत खैराच्या लाकडाची विक्री किलोच्या व वाजवी दराने होत असताना, वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी एवढ्या मोठ्या प्रमाणातील लाकडाची किंमत केवळ १२ हजार रुपये कशी काय दाखवली? हा सर्वसामान्य नागरिकांच्या डोळ्यात फेकलेला धूळफेक असून, याद्वारे बड्या लाकूड तस्करांना पाठीशी घालण्याचा जाणीवपूर्वक आणि संगनमताने प्रयत्न सुरू आहे का?'' असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

मॅगी पॅकेटमध्ये जिवंत किडे

मॅगीचा क्रेझ प्रचंड वाढला आहे. जेवणातही मुले मॅगीची मागणी करतात. अशा वेळी ब्रँडेड कंपनीच्या सीलबंद पाकिटातच किडे निघत असतील तर मुलांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळे म्हसळा शहरात अनेक दुकानांमध्ये एक्सपायरी जवळ आलेला किंवा अयोग्य पद्धतीने साठवलेला माल विकला जातो का, हा सवाल आता उपस्थित होत आहे. मॅगीसारख्या नामांकित कंपनीच्या प्रोडक्टमध्ये असे किडे येत असतील तर अन्न व औषध प्रशासन विभागाने तातडीने दुकाने, गोदामे आणि वितरकांची तपासणी करावी, अशी मागणी पालक वर्गातून होत आहे.

दूध प्रकल्पांवर एफडीएचा बडगा

सावरीया मिल्क अँड मिल्क प्रॉडक्ट आणि रॉयल फूड्स या आस्थापनांची एफडीएच्या पथकाने तपासणी केली. सहाय्यक आयुक्त अजित मैत्रे यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. या कारवाईदरम्यान मातेश्वरी फुड्समधील ५९८ लिटर आणि सावरीया मिल्क अँड मिल्क प्रॉडक्टमधील ८९६ लिटर दूध नष्ट करण्यात आले. तसेच, रॉयल फूड्समधील दही जप्त करण्यात आले. दुधाचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले असून, अहवालानंतर पुढील कारवाई केली जाणार असल्याचे सहाय्यक आयुक्त अजित मैत्रे यांनी सांगितले. या प्रकरणी बासदेव यादव, संजय यादव, नारायणलाल दांगी, आशा यादव, राधेश्याम यादव आणि संतोष ठाकूर या सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भेसळयुक्त दूध व दुग्धजन्य पदार्थ तयार करणे, साठवणे आणि विक्री केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. भारतीय न्याय संहिता तसेच अन्न सुरक्षा व मानदे कायद्यानुसार गुन्हा नोंदविण्यात आला असून, तळोजा पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

देशासह राज्यात दडपशाहीचे वातावरण

यावेळी व्यंगचित्रकार गौरव सर्जेराव, रोहित ढाले आदी उपस्थित होते. नीट पेपर फुटीनंतर देशासह महाराष्ट्रात वेगवेगळ्या भागात विद्यार्थ्यांनी आंदोलने सुरू केली आहेत. ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासह वेगवेगळ्या मागण्यांसाठी गेल्या अनेक दिवसांपासून विद्यार्थी रस्त्यार उतरले आहेत. जूलै महिन्यापासून सुरु असलेली ही आंदोलने आता वेगवेगळ्या ठिकाणी केली जात आहेत. दिल्लीसह मुंबई, पुणे व अन्य भागांमध्ये विद्यार्थी एकवटले आहेत. संविधान मानणारे विद्यार्थी शांततेच्या मार्गाने आंदोलनात सहभागी झाले आहेत. मात्र, सरकार पोलीस बळाचा वापर करीत विद्यार्थ्यांचे आंदोलन मोडीत काढण्याचा प्रयत्न केला जात आहे. सायबर विभागाच्या मदतीने अनेक विद्यार्थ्यांचे सोशल मिडीया अकाऊंट बंद केले जात आहेत. वेगवेगळ्या पोस्ट डिलीट मारल्या जात आहे. विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन त्यांना बेकायदेशीररित्या डांबून ठेवण्याचे काम पोलिसांमार्फत होत आहे. याबाबत न्यायालयात दाद मागण्यात आली असून, ज्ञानेशकुमार यांचा राजीनामा होईपर्यंत आंदोलन सुरूच राहणार आहे. व्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणण्याचे काम सरकार करीत आहेत. सत्ताधाऱ्यांविरोधात सोशल मिडीयावरील असलेल्या पोस्ट उडविल्या जात आहेत. व्यंगचित्र व इतर पोस्ट बंद करण्यासाठी सरकारने यंत्रणा बसवली आहे. देशासह राज्यात दडपशाहीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांकडून होणाऱ्या अनाधिकृत कारवाईचा निषेध व्यक्त केला जात असून, ही दडपशाही थांबवा अन्यथा तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशारा साम्या कोरडे यांनी दिला.

८६ हजार कोटींची देयके प्रलंबित

अकरा महिन्यांत नऊ उद्योजक कंत्राटदारांनी आत्महत्या करून आपले जीवन संपविले आहे. या समस्यांबाबत मात्र शासनासह प्रशासनाकडून बघ्याची भुमिका घेण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. अनेक विभागाकडील जवळपास ८६ हजार कोटी रुपयांची देयके प्रलंबित आहेत. मात्र, शासन हा निधी देण्यास टाळाटाळ करीत आहे, असा आरोप कंत्राटदारांनी केला आहे. काम करण्यासाठी कार्यालयात डिपॉजीट केलेला निधीदेखील अधिकाऱ्यांकडून दिला जात नाही. शासनाच्या प्रशासनाच्या बेजबाबदारीचा त्रास कंत्राटदारांना प्रचंड होत असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ कोकण विभागाच्यावतीने पालकमंत्री भरत गोगावले यांना सोमवारी (दि.१९) निवेदन देण्यात आले. या निवेदनात, कंत्राटदारांचे प्रलंबित देयके व इतर समस्या, अडचणी सोडविण्यासाठी तातडीने उच्च स्तरिय समिती गठीत करण्याची मागणी करण्यात आली आहे. अन्यथा जिल्ह्यातील अधिकाऱ्यांच्या घराचे नळ बंद करण्यात येईल, असा इशारा संघटनेच्यावतीने देण्यात आला आहे. यावेळी प्रकाश पालरेचा उपस्थित होते.

जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड

यावेळी अन्य १० जण दोन गटांत बावन्न पत्त्यांवर पैशांची बाजी लावून जुगार खेळत असल्याचे आढळून आले. या कारवाईत एकूण ११ जणांवर गुन्हा नोंदविण्यात आला आहे. जप्त केलेल्या मुद्देमालामध्ये रोख रक्कम आणि विवो, ओप्पो व सॅमसंग कंपन्यांच्या मोबाईल फोनचा समावेश आहे. पोलिसांच्या नोंदीनुसार, जप्त मुद्देमालाची एकूण किंमत २ लाख ७ हजार २०० रुपयांचा आहे.

चॉपरने वार करून दुखापत

वावंढळ येथील सर्व्हे क्रमांक ६५/१, ६५/२, ६६/१, ६६/२ तसेच इतर सर्व्हे क्रमांकांतील एकूण सुमारे ७.५ एकर क्षेत्राची मिळकत फिर्यादी यांच्या वडिलोपार्जित मालकीची होती. ही मिळकत सुमारे ४० वर्षांपूर्वी विक्री करण्यात आली होती. या ठिकाणी इस्कॉन ट्रस्टच्या माध्यमातून मंदिर व शाळा बांधण्याचे नियोजन असल्याचे सांगण्यात आले आहे. संबंधित जागेवर गवत साफ करण्याचे काम सुरू असताना या ठिकाणी वाद झाला होता.

शिक्षकांना दिवाळीच्या सुट्टीत जबाबदारी

विशेष शालेय स्वच्छता मोहीम राबविण्याचे निर्देश; निधी मिळणार नसल्याचे स्पष्ट संकेत

| रायगड | प्रतिनिधी |

राज्यातील शिक्षकांना विविध कामे सोपविल्या जातात. अध्यापन सोडून इतरच कामे अधिक असतात, अशी ओरड पण होत असते. पण उपाय नाही, असा हताश सूर शिक्षक व्यक्त करीत असतात.

शाळा हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा मुख्य केंद्रबिंदू असून विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबतच स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, शिस्त आणि सामाजिक जाणिवांचे धडे मिळावेत, असे शासनाचे म्हणणे.


दिवाळी सुट्टीचा उपयोग

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागातर्फे एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील सर्व शासकीय व अनुदानित शाळांमध्ये आगामी दिवाळीच्या कालावधीचा सकारात्मक उपयोग करून चला शाळेत जाऊ या विशेष शालेय स्वच्छता मोहीम राबविण्याचे अधिकृत परिपत्रक नुकतेच जारी करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांसाठी शाळांचा परिसर अधिक स्वच्छ, सुंदर, सुरक्षित आणि आनंददायी राहावा, तसेच अध्ययन-अध्यापनासाठी पोषक वातावरण तयार व्हावे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

समग्र शिक्षा योजनेअंतर्गत शाळांमध्ये मूलभूत सुविधा आणि अनुकूल शैक्षणिक वातावरण निर्मितीवर नेहमीच भर दिला जातो. याच पार्श्वभूमीवर शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक, पालक, माजी विद्यार्थी, ग्रामस्थ आणि स्थानिक समुदायाला एकत्र आणून माझी शाळा-माझी जबाबदारी या भावनेतून ही मोहीम हाती घेण्यात आली आहे.

शासनाच्या निर्देशांमुळे शिक्षकांची दिवाळी स्वच्छता करण्यातच संपणार आहे. विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यासाठी कोणताच निधी मिळणार नसल्याने शिक्षकांची अडचण होणार आहे. विद्यार्थ्यांनादेखील दिवाळी सुट्टीत स्वच्छता राखण्यासाठी शाळेत जावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.



दोन टप्प्यांत अंमलबजावणी

पहिला टप्पा (१८ ते २४ ऑक्टोबर २०२६) या कालावधीत नियोजन व पूर्वतयारी केली जाईल. यात शाळा व्यवस्थापन समितीची बैठक घेणे, वर्गखोल्या, प्रयोगशाळा, ग्रंथालय, संगणक कक्ष, क्रीडांगण व पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेची पाहणी करणे, तसेच आवश्यक दुरुस्ती आणि निरुपयोगी साहित्याची (भंगार) यादी तयार करून कृती आराखडा बनवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दुसरा टप्पा (२५ ते ३१ ऑक्टोबर २०२६) प्रत्यक्ष कारवाईच्या या टप्प्यात शाळांची सखोल साफसफाई केली जाईल. यामध्ये वर्गखोल्यांची स्वच्छता, स्वच्छतागृहांची विशेष स्वच्छता, पाण्याच्या टाक्यांची सफाई, कचरा वर्गीकरणाची योग्य व्यवस्था तसेच विद्युत उपकरणे व फर्निचरची किरकोळ दुरुस्ती व विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या उपाययोजनांना प्राधान्य दिले जाणार आहे.

आर्थिक तरतूद व लोकसहभाग

या मोहिमेसाठी शाळांना कोणतीही अतिरिक्त किंवा स्वतंत्र निधी दिला जाणार नाही. समग्र शिक्षा अंतर्गत शाळांच्या दैनंदिन गरजांसाठी मिळणाऱ्या एकत्रित अनुदानातून नियम नुसार खर्च भागवण्याची मुभा देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, या मोहिमेदरम्यान कोणत्याही विद्यार्थ्यांकडून सक्तीची किंवा अनिवार्य आर्थिक वर्गणी गोळा करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. मोहिमेच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, गटशिक्षणाधिकारी ते शिक्षणाधिकाऱ्यांपर्यंत सर्व स्तरांवर जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या असून, प्रत्येक शाळेने मोहीम सुरू करण्यापूर्वी आणि पूर्ण झाल्यानंतरची छायाचित्रे जतन करून ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या व्यापक मोहिमेमुळे राज्यातील शाळांचे रूपडे पालटून विद्यार्थ्यांसाठी आरोग्यदायी व प्रेरणादायी वातावरण निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. पण शिक्षक आता या नव्या जबाबदारीस कितपत गांभीर्याने घेतात, हे पाहणे रंजक ठरणार.

निवडक




विद्यार्थ्यांसह शिक्षकांनी धरला दांडियाचा ताल

चिरनेर : बी. एस. पाटील इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये दांडिया उत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला. या उत्सवासाठी विद्यार्थ्यांनी आकर्षक पारंपरिक वेशभूषा परिधान केली होती. रंगीबेरंगी पोशाखातील विद्यार्थ्यांनी संगीताच्या तालावर सुंदर दांडिया नृत्य सादर करून सर्वांची मने जिंकली.या कार्यक्रमात शिक्षकांनीही विद्यार्थ्यांसोबत नृत्यात सहभागी होऊन आनंद द्विगुणित केला. शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी एकत्र नृत्याचा आनंद घेतला. संपूर्ण शाळेचे वातावरण उत्साह, आनंद आणि चैतन्याने भरून गेले होते. या आनंदाच्या प्रसंगी सर्व विद्यार्थ्यांना आईस्क्रीमचे वाटप करण्यात आले. आईस्क्रीमचा आस्वाद घेत विद्यार्थ्यांनी या उत्सवाचा मनमुराद आनंद लुटला.भारतीय संस्कृती आणि परंपरांची ओळख करून देणारा हा कार्यक्रम विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय ठरला. आनंद, उत्साह आणि एकतेच्या वातावरणात दांडिया उत्सवाची सांगता झाली.

'सारडेतील घरांना प्रॉपर्टी कार्ड द्या'

उरण : उरण तालुक्यातील गावठाण विस्ताराचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, गावातील सर्व घरांना प्रॉपर्टी कार्ड मिळावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते व गावठाण विस्ताराचे अभ्यासक मनोज कृष्णा पाटील यांनी केली आहे.



केवळ मूळ गावठाणातील घरांचे सर्वेक्षण करून विस्तारित गावठाणातील घरांना वगळण्यात येऊ नये, यासाठी ग्रामस्थ, रहिवासी, ग्रामपंचायती आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी वेळीच भूमिका मांडावी, असे आवाहन त्यांनी केले आहे.उरण पंचायत समिती येथे तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या उपस्थितीत जिल्हा भू-अभिलेख अधीक्षकांची बैठक झाली. या बैठकीत १९६६ मध्ये मान्यता मिळालेल्या मूळ गावठाणातील घरांचे सर्वेक्षण करून त्यांना सनद अर्थात प्रॉपर्टी कार्ड देण्याबाबत माहिती देण्यात आल्याचे समजते. या प्रक्रियेत विस्तारित गावठाणातील घरांचाही समावेश होणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. मनोज पाटील यांच्या म्हणण्यानुसार, ब्रिटिश काळात १९३२ मध्ये गावठाणाची मोजणी करण्यात आली होती, तर १९६६ मध्ये महाराष्ट्र राज्यात मूळ गावठाणाला मान्यता मिळाली आहे.



मुलीच्या पोटातून काढली पिन

पोलादपूर : महाड तालुक्यातील तरुणीच्या पोटात अडकलेली टाचणीसारखी टोकदार पिन एंडोस्कोपीच्या माध्यमातून यशस्वीरित्या काढण्यात आली. ही उपचार प्रक्रिया बी. के. एल. वालावलकर रुग्णालय डेरवण, सावर्डे येथे ग्रॅस्ट्रोलॉजिस्ट डॉ.आनंद जोशी यांनी केली. महाड येथील एका खेडेगावात राहणाऱ्या १९ वर्षीय मुलीने खेळता खेळता एक टोकदार पिन तोंडात धरली होती. त्याचवेळी अचानकपणे ती पिन तिच्या घशात गेली. मुलीने घाबरून हि गोष्ट आपल्या आई वडिलांना सांगितली. आई वडीलांनी तिला त्वरीत शासकीय रुग्णाल्यात दाखल केले. तेथे एक्स-रे केल्यावर ती पिन मुलीच्या जठरामध्ये आढळली. तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मुंबई किंवा पुणे येथे उपचारार्थ दाखल करण्यासाठी सांगितले. परंतु हा खर्च न परवडण्याजोगा असल्याकारणाने तिच्या वडीलांनी बी. के. एल. वालावलकर रुग्णालय गाठले. तेथे प्रसिद्ध ग्रॅस्ट्रोलॉजिस्ट डॉ. आनंद जोशी यांनी एंडेस्कोपीद्वारे पिन काढण्याचा निर्णय घेतला. अत्यंत काळजीपूर्वक करण्यात आलेल्या प्रक्रियेत कोणतीही मोठी शस्त्रक्रिया न करता एंडोस्कोपीच्या सहाय्याने पिन बाहेर काढण्यात आली.

नवरात्रौत्सव मंडळातर्फे विविध कार्यक्रम

मुरूड : तालुक्यात देवीची स्थापना करण्यात आली आहे. पूर्वी शहरात गुजर-मारवाडी समाज नवरात्रोत्सवात दांडिया रास, गरबा नृत्य पेश करीत असत, परंतु अलीकडे आदिवासी वाड्यांवरदेखील दांडियाचा आनंद लुटताना बांधव दिसतात. लक्ष्मीखार मंडळांतर्फे अस्सल ग्रामीण ढंगाचे नाच आयोजित करून ग्रामीण लोक कलेला प्रोत्साहन मिळताना दिसते. राजपुरी येथील शाहीर घागरी यांचे नाच मंडळ विविध ठिकाणी बहारदार कार्यक्रम करीत आहेत. महिला वर्गासाठी हा उत्सव पर्वणीच म्हणता येईल. मुरुड येथील गणेश आळीत बल्लाळ विनायक महिला मंडळातर्फे विशेष कार्यक्रम म्हणजे भोंडल्याचा कार्यक्रम रंगतदार ठरतो. मेघरूपी ऐरावत म्हणजे इंद्रदेवाचे प्रिय वाहन. याला हादगा असेही संबोधतात. हत्तीच्याच कृपेने साक्षात लक्ष्मी प्राप्त होते, अशी धारणा म्हणूनच हस्त नक्षत्राची सुरुवात होताच या उत्सव सुरु होतो.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- चेंढरे येथे सोसायटी/कनव्हेंस डिड झालेल्या नवीन इमारतीमधील तीन २ बीएचके रेडी पझेशन फ्लॅट विकणे आहेत. संपर्क : ८१८०८६१२३४/८१८०८५१२३४ एजंट क्षमस्व.
- अलिबागमधील आर्किटेक्चर आणि इंटिरियर डिझायनिंग ऑफिसकरीता ऑटो कॅड ड्राफ्टसमन हवा आहे. संपर्क : ९७६२७७७९७५

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१



● अलिबागच्या समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांच्या गर्दीने जलक्रीडा, उंट सफर आणि एटीव्ही राईडचा मनमुराद आनंद लुटत विकेंड साजर केला. (छायाचित्र : समीर मालोदे)

खारीपट्ट्याच्या लढ्याला ऐतिहासिक सुरुवात



| आंबेत | प्रतिनिधी |

शासकीय विश्रामगृह, आंबेत येथे रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्याना जोडणाऱ्या आपली जीवनवाहिनी सावित्री नदी आणि संपूर्ण खारीपट्ट्याच्या रक्षणासाठी खारीपट्टा संरक्षण समितीची अधिकृत स्थापना मोठ्या दिमाखात आणि जनसागराच्या उपस्थितीत संपन्न झाली.

सभेच्या सुरुवातीलाच समितीचे मुख्य उद्देश, भविष्यातील वाटचाल आणि खारीपट्ट्याच्या सर्वांगीण विकासाचे महत्त्वाचे मुद्दे यावर सर्वंकष चर्चा करण्यात आली.

सभेमध्ये सावित्री नदीतील पारंपरिक रेती व्यवसायाचा मुद्दा प्रामुख्याने गाजला. खारीपट्टा संरक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष अझहर धनसे यांनी प्रशासनाला कडक इशारा दिला. ते म्हणाले, आमच्या भूमिपुत्रांचे पारंपरिक रेती आणि हातपटी व्यवसाय बंद पाडून, शासनाने इतर तालुक्यातील बड्या उद्योगपतींना सावित्री नदी व उपनद्यांमध्ये ड्रेजर चालवण्याची जी मुभा देण्याचे घाट घातले आहेत, ते आम्ही अजिबात खपवून घेणार नाही! प्रशासनाने आमच्या पारंपरिक व्यवसायाला अधिकृत मान्यता दिली नाही, तर बाहेरून येणाऱ्या या ड्रेजर मालकांना आमच्याकडून कोणतेही सहकार्य मिळणार नाही. वेळ आल्यास या अन्यायाविरोधात समितीच्या वतीने उग्र जनआंदोलन उभारले जाईल, असा इशारा देण्यात आला.

■ खारीपट्टा संरक्षण समितीची यशस्वी स्थापना

खारीपट्ट्यात एमआयडीसीचे सोडले जाणारे प्रदूषित पाणी आणि त्यामुळे होणारा पर्यावरणाचा विनाश यावर सभेचे प्रमुख म मार्गदर्शक निजामुद्दीन जलाल यांनी अत्यंत परखड विचार मांडले. शासनाचे याकडे होणारे दुर्लक्ष ही मोठी शोकांतिका असून, हे प्रदूषण रोखण्यासाठी सर्वांनी एकवटले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले.

या सभेत जुल्फिकार टोल यांनी सावित्री नदीची महत्त्वाची उपनदी असलेल्या काळ नदीकडे सर्वांचे लक्ष वेधले. सावित्री नदीबरोबरच काल नदीवर देखील सध्या मोठा अन्याय होत असून पोलादपूर ते बाणकोट दरम्यानच्या सावित्री नदीच्या आणि तिच्या सर्व उपनद्यांचे भविष्यात रक्षण करणे अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

आदिवासी विद्यार्थ्यांसाठी गडकिल्ले छायाचित्र प्रदर्शन

| खांब | प्रतिनिधी |

नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून दुर्गवीर प्रतिष्ठान यांच्या माध्यमातून रोहा तालुक्यातील विठ्ठलवाडी येथील आदिवासी शाळेत गडकिल्ल्यांचे छायाचित्र प्रदर्शन तसेच गडसंवर्धन व ऐतिहासिक वारसा जतन करण्याबाबत जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमात परिसरातील अन्य दोन शाळांनीही सहभाग नोंदविला.

दुर्गवीर प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष हासुरकर यांच्या म मार्गदर्शनाखाली दुर्गवीर प्रतिष्ठानचे रायगड जिल्ह्याविभागीय रोहा तालुका दुर्गवीर प्रमुख किशोर सावरकर यांच्या माध्यमातून या प्रदर्शनात महाराष्ट्रातील ऐतिहासिक गडकिल्ल्यांची



माहिती, त्यांचे ऐतिहासिक महत्त्व, गडसंवर्धनाची गरज आणि ऐतिहासिक वारसा जतन करण्याचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयी आवड निर्माण व्हावी तसेच गडकिल्ल्यांच्या संवर्धनाबाबत जागरूकता निर्माण व्हावी, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.यावेळी दुर्गवीर प्रतिष्ठानतर्फे आदिवासी विद्यार्थ्यांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमासाठी दुर्गवीर प्रतिष्ठानचे तालुका प्रमुख किशोर सावरकर, योगेश मोरे, किरण गायकर, मानसी पारटे, विजय मरवडे तसेच संबंधित शाळांचे शिक्षक उपस्थित होते. ऐतिहासिक वारशाचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे आणि सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांशी स्नेहाचे नाते निर्माण करणे, या दृष्टीने हा उपक्रम उत्साहात पार पडला.

चरसप्रकरणी गुन्हा दाखल

| पनवेल | प्रतिनिधी |

तळोजा जेलम धील आतल्या बाजूला मुलाखत प्रतीक्षालयाच्या पत्र्यावर अमली पदार्थ टाकल्याप्रकरणी अज्ञात इसमाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. १५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५:१५ च्या सुमारास अज्ञात इसमाने ४ ग्रॅम वजनाचा तपकिरी रंगाचा चिकट मादक पदार्थ प्लास्टिकच्या कागदात गुंडाळून त्यावर पिवळ्या रंगाची सेलोटेप लावली आणि तुरुंगातील कैद्याला नशेसाठी पुरवण्याच्या उद्देशाने तळोजा जेल येथील आतल्या बाजूला असलेल्या मुलाखत प्रतीक्षालयाच्या पत्र्यावर टाकून देऊन तो पळून गेला. ही बाब पोलिसांच्या निदर्शनात आल्याने उघड झाली.

मुरूडमध्ये महसूल सेवक भरतीसाठी १५१ अर्ज दाखल

| आगरदांडा | प्रतिनिधी |

मुरूड तालुक्यात महसूल सेवक संवर्गाच्या सरळसेवा भरती २०२६ अंतर्गत ११ पदांसाठी एकूण १५१ अर्ज दाखल झाले आहेत. मात्र, एसईबीसी आणि ईडब्ल्यूएस या दोन प्रवर्गांतील पदांसाठी एकही अर्ज प्राप्त झालेला नसल्याची माहिती समोर आली आहे.

तहसील कार्यालयामार्फत राबविण्यात येत असलेल्या या भरती प्रक्रियेत अनुसूचित जाती प्रवर्गातील सर्वसाधारण एक आणि महिला एक अशा दोन पदांसाठी २५ अर्ज प्राप्त झाले आहेत. भटक्या जाती (ब) प्रवर्गातील सर्वसाधारण एका पदासाठी पाच अर्ज दाखल झाले आहेत. मागासवर्गीय प्रवर्गातील सर्वसाधारण पदासाठी एकही अर्ज आलेला नाही. इतर मागासवर्गीय प्रवर्गातील सर्वसाधारण एका पदासाठी ४८ अर्ज प्राप्त झाले आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गातील दोन पदांसाठीही एकही अर्ज दाखल झालेला नाही. खुल्या अथवा अराखीव प्रवर्गातील सर्वसाधारण तीन आणि महिला पदासाठी एकूण ७३ अर्ज प्राप्त झाले आहेत.

स्त्रियांनी स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण घेणे गरजेचे

व्याख्याते सचिन वासस्कर यांचे प्रतिपादन

| चिरनेर | प्रतिनिधी |

नवरात्र हा मांगल्याचा, पावित्र्याचा व स्त्रीशक्तीचा जागर करण्याचा उत्सव असून, देवीच्या पराक्रमाची उपासना करणारा हा उत्सव आहे. समाजाची ढासळलेली नीतिमत्ता पाहता प्रतिकूल प्रसंगांना सामोरे जाण्यासाठी स्त्रियांनी स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण घेणे अत्यंत गरजेचे बनले आहे. असे प्रतिपादन व्याख्याते सचिन वासस्कर यांनी केले.



अभिनव सामाजिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा मंडळाच्या नवरात्र उत्सवानिमित्ताने श्रीराम प्रसादिक भजन मंडळाच्या सामाजिक व धार्मिक योगदानाचा गौरव करणारा ज्येष्ठ भजनी मंडळ अभिनव सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी व्याख्याते सचिन वासस्कर हे बोलत होते.


या अभिनव सन्मान सोहळ्यात समाजाला धार्मिक कार्याची प्रेरणा देणाऱ्या चिरनेर येथील श्रीराम प्रासादिक भजनी मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या उल्लेखनीय व प्रेरक कार्याचा गौरव अभिनव नवरात्र उत्सव मंडळाकडून अभिनव सन्मान देऊन, मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यात भजनीबुवा वसंत चिर्लेकर, वामन म्हात्रे, दत्तात्रेय मोकल, शंकर नारंगीकर, रमेश गोंधळी, कृष्णा म्हात्रे, धनाजी नारंगीकर, बळीराम फोफेरकर, कमळाकर केणी, विश्वास मोकल, निशांत चिर्लेकर या सर्व भजनी मंडळीचा व्याख्याते सचिन वासस्कर, कार्याध्यक्ष पद्माकर फोफेरकर, अध्यक्ष सुनील नारंगीकर, उत्सव समितीचे अध्यक्ष नितीन नारंगीकर, विकास म्हात्रे, पदाधिकारी राजेंद्र भगत व रवींद्र भगत यांच्यासह अन्य कार्यकर्त्यांच्या हस्ते शाल श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

झेंडूच्या फुलांनी ओलांडली शंभरी | खरेदीसाठी ग्राहकांची अलोट गर्दी

विजयादशमीनिमित्त जिल्ह्यातील फुलबाजार फुलला

| रायगड | जिल्हा प्रतिधी |

नवरात्रौत्सवानंतर रायगड जिल्ह्यात विजयादशमी अर्थात दसरा सण मंगळवारी (दि.२०) साजरा केला जाणार आहे. ऊर्जा, शक्ती व मांगल्याचे प्रतीक म्हणून मानल्या जाणाऱ्या झेंडूच्या फुलांनी फुलबाजार फुलला असून, जिल्ह्यातील बाजारपेठा फुलांनी गजबजून गेल्या आहेत. फुले खरेदीसाठी ग्राहकांनी गर्दी केली असून, यंदा फुलांनी शंभरी पार केली आहे. यावेळी एक किलो फुलांमागे ग्राहकांना शंभर रुपये मोजावे लागत असून आंब्याची पाने, भाताच्या कणश्याच्या माळी आकारानुसार, ४० ते ६० रुपयांना विक्रीसाठी उपलब्ध आहेत.



साडेतीन मुर्हूतापैकी असलेल्या दसऱ्याच्या मुहूर्तावर अवजारे पुजनासह घर फुलांनी सजवणे आणि नवनवीन वस्तू घेण्याचा क्रेझ कायमच आहे. यंदाही मंगळवारी दसऱ्यानिमित्त अवजारे पुजनासह घरे फुलांनी सजविले जाणार आहेत.

दरवाजासमोर फुलांसह कणश्या आणि आंब्याच्या पानांच्या माळा लावल्या जाणार आहेत. त्यासाठी लागणारी झेंडूची फुले सोमवार सकाळपासूनच अलिबागसह जिल्ह्यातील अनेक बाजारात दाखल झाली आहेत. त्यामुळे अनेक बाजारपेठा फुलांच्या विक्रीच्या दुकानांनी सजल्या आहेत.

पिवळी आणि केशरी रंगाची झेंडूची फुले बाजारात मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाली आहेत. ही फुले खरेदीसाठी ग्राहकांनी मोठ्या प्रमाणात बाजारात गर्दी करत आहेत. सोमवारी सकाळपासून जिल्ह्यातील बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी गर्दी दिसून आली. संध्याकाळी तर संपूर्ण बाजारपेठ फुलून गेली होती.

मिरवणुकांसह रावणदहन

दसऱ्यानिमित्त रायगड जिल्ह्यातील अलिबाग, पेण, महाड तालुक्यात रात्री दहानंतर रावण दहनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. तसेच, जिल्ह्यातील काही ठिकाणी सोमवारी सकाळपासूनच मिरवणूका, सांस्कृतिक कार्यक्रम घेतले जाणार आहेत. या निमित्ताने जिल्ह्यामध्ये रायगड पोलिसांमार्फत कडेकोट बंदोबस्त लावण्यात येणार आहे. त्यामुळे ६० हून अधिक अधिकारी व कर्मचाऱ्यांचा पहारा असणार आहे.

बुद्धविहारांमध्ये होणार बुद्ध वंदना

बौद्ध समाजात विजयादशमी हा दिवस अशोक विजयादशमी आणि धम्मचक्र प्रवर्तन दिन म्हणून अत्यंत उत्साहाने साजरा केला जातो. त्यानिमित्ताने जिल्ह्यातील अनेक बुद्ध विहारांमध्ये बुद्ध वंदना घेऊन वेगवेगळ्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच, ठिक ठिकाणी वेगवेगळ्या संस्था, संघटनांच्यावतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केले जाणार आहेत.

कर्तृत्ववान महिलांना ‘नवदुर्गा पुरस्कार’



पनवेल : समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या नऊ कर्तृत्ववान महिलांचा दिशा महिला मंचाच्या वतीने ‘नवदुर्गा पुरस्कार’ देऊन गौरव करण्यात आला. गेल्या सात वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. सुजाता बत्तीन, मनीषा काटकर, मंदाकिनी पाटील, अंजली तावटे, किरण जुनगडे, वृषाली सूर्यवंशी, मधुरा दंडवते, सुवर्णा तोंडुलकर आणि गौरी क्षीरसागर यांना नवदुर्गा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आ.विक्रांत पाटील प्रतिष्ठानच्या मार्गदर्शक व समाजसेविका मोहिनी पाटील, नगरसेविका स्नेहलता धमाले, छाया पाटील तसेच दिशा व्यासपीठाच्या संस्थापक नीलम आंधळे आणि विद्या मोहिते यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

श्री.आर. एन. चव्हाण सो. नि.७२
४ थे सह दि.न्या.व.स्तर पनवेल
ॲड. एस.वाय.बारटके
वादी यांचे वकील
जाहीर नोटीस ने.ता. २७/११/२०२६
पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो. यांचे न्यायालयात
स्पेशल मुकदमा क्र. १८३/२०२६
मे.हार्दिसा रियल्टी नोंदणीकृत भागिदारी संस्था वादी
विरूद्ध
६/३) श्री. हिमांशु शिवलाल पटेल
मु. फ्लॅट नं. १७०२, कस्तुरी हाईट्स,
प्लॉट नं. ३९, सेक्टर नं. २०, खारघर,
ता. पनवेल, जि. रायगड -४१०२१०
६/५) श्री. हरेश मगनभाई पटेल
मु. फ्लॅट नं. २०२, अजयदिप को. ऑप.
हौसिंग सोसायटी, प्लॉट नं. १९, सेक्टर नं. १९, प्रतिवादी
रामशेठ ठाकुर शाळा, खारघर,
ता.पनवेल, जि. रायगड- ४१०२१०
६/६) श्री. हरीभाई मदाभाई पटेल
मु. फ्लॅट नं. १०२, दामोदर शांती को. ऑप.
हौसिंग सोसायटी, प्लॉट नं. १० सी व १० डी,
सेक्टर नं. २०, खारघर, ता. पनवेल,
जि.रायगड - ४१०२१०

या जाहीर संमन्स/नोटीस द्वारे आपणांस कळविण्यात येते की, मौजे वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथील सर्व्हे नं. ३३४/१४, ३३४/५, ३३५/१०, ३३५/१५, ३३५/५, ३३५/७, ३५७/२२, ३५७/७ व ३५७/९ मिळकती शासनामार्फत नवी मुंबई विमानतळा करीता संपादीत झाल्या असुन त्या संपादनापोटी प्राप्त झालेला नोड पुष्पकनगर, सेक्टर क्र. ७, भुखंड क्र. ४१ डी, क्षेत्र ८३० चौ. मिटर या मिळकती संदर्भात वादी यांनी या न्यायालयात हक्क प्रस्थापना करीता, कराराची विशेष पुर्तता करून मिळणे, त्रिपक्षीय करार रद्द करून मिळणे करीता व निरंतरचे ताकिदी करीता दावा दाखल केला आहे. दाव्यामध्ये तुमचा पत्ता वर प्रमाणेच आहे. मात्र, तुम्ही संमन्स/नोटीस घेण्यास टाळाटाळ करीत आहात, या कारणाकरीता नोटीशीची बजावणी झालेली नाही. सबब, या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, वर नमुद दाव्याचे काम तुम्ही, स्वतः अगर आपले नेमलेले प्रतिनिधी वा वकिल यांचे मार्फत या मा. दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर, पनवेल यांचे न्यायालयात दिनांक २७/११/२०२६ रोजी हजर रहावे. आपण हजर न राहिल्यास एकतर्फी काम चालेल, याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १९/१०/२०२६ रोजी माझ्या सहिनीशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

सही/- सही/-
कनिष्ठ लिपीक **सहा अधिक्षक**
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर
पनवेल-रायगड पनवेल- रायगड

जाहीर सूचना

तमाम जनतेस या जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेली मिळकत कायमस्वरूपी मालकी हक्काने खरेदी करण्याचे ठरविले असून, त्या अनुषंगाने सदर मिळकतीचे विद्यमान मालक - (१) शिरीष धर्माजी म्हात्रे (२) प्रवीण धर्माजी म्हात्रे (३) निलम महेश म्हात्रे (४) प्रमिला नरेंद्र पाटील (५) लता श्याम पाटील (६) विठाबाई यशवंत म्हात्रे (७) जितेंद्र यशवंत म्हात्रे (८) वैशाली धिरज घरत (९) श्याम पांडुरंग म्हात्रे (१०) नित्यानंद पांडुरंग म्हात्रे (११) पद्मावती विनायक ठाकूर (१२) प्रमिला परमानंद म्हात्रे (१३) प्रथमेश परमानंद म्हात्रे (१४) सारंग परमानंद म्हात्रे (१५) महादेव रामभाऊ पाटील (१६) काशिनाथ रामभाऊ पाटील (१७) अविनाश रामभाऊ पाटील (१८) प्रभाकर बंडु ठाकूर (१९) विजय बंडु ठाकूर (२०) मिराबाई नारायण पाटील (२१) प्रफुल्ल गोपाळ म्हात्रे (२२) मनोज गोपाळ म्हात्रे (२३) विजया जनार्दन भगत (२४) वृंदा गोपाळ म्हात्रे (२५) सायली संजय म्हात्रे (२६) अमोल गजानन म्हात्रे आणि (२७) पूजा प्रभाकर देवळे यांचे मालकी हक्क आम्ही तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून, ती विकण्याचा त्यांना पूर्ण हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. तथापि, कोणत्याही व्यक्तीस अगर संस्थेस सदर मिळकतीसंदर्भात अथवा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त हक्क, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्य कोणत्याही प्रकारे व कोणत्याही स्वरूपाचा असल्यास, त्यांनी त्याबाबतची लेखी सूचना, आपल्या हक्काच्या पुष्ट्यर्थ असलेल्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रतींसह, क्वाड्रा लीगल (Quadra Legal), वकील व सॉलिसिटर्स, ४ था मजला, जलाराम ज्योत, जन्मभूमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत द्यावी.

वरील मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास, सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निर्विवाद मालकी हक्काची आहे असे गृहीत धरून आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, तसेच संबंधितांनी आपला दावा, मागणी अथवा आक्षेप सोडून दिला आहे असे समजण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अनुसूची
(मिळकतीचे वर्णन)

नोंदणी जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्रातील, मौजे हाशिवरे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड, महाराष्ट्र राज्य येथे स्थित असलेली भूमापन क्रमांक व उपविभाग ८/२, एकूण क्षेत्रफळ ०.१०.४० हे.आर.चौ.मी. ही संपूर्ण शेतजमीन, तिजवरील सर्व हक्क, सुविधाधिकार, वहिवाट व अनुषंगिक लाभांसह.

ठिकाण : मुंबई
दिनांक : १९ ऑक्टोबर २०२६
क्वाड्रा लीगल करीता
सही/-
विक्रांत झुंजारराव
(+ ९१ ९८३३६ २५१९५)

जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. प्रशांत पंढरीनाथ खडे यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालक १. श्रीम. बायमाबाई सदाशिव कर्णुक २. श्री. सुभाष सदाशिव कर्णुक, ३. श्री. संदेश सदाशिव कर्णुक, ४. श्रीम. छाया बाळाराम साळोखे यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

मौजे. गुढवण, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र (हे. आर.)	आकार (रू. पै.)
५१	१९/ब	०-२८-०० पो.ख. ०-०२-००	०-१६

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि. २०/१०/२०२६.
ॲड. नरेश रामदास आहीर.
पत्ता - शॉप नं. १२, शिवगंगा
अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी, नेरळ
ता.कर्जत, जि.रायगड- ४१०१०१.
मो. - ९३२५०६००३७/९०११२९२९८७.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की.

मौजे वढाव खुर्द ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद जमिन मिळकत ही आमचे अशिल यांनी खालील नमूद मिळकतींचे विद्यमान मालक यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे. मिळकतींचे वर्णन खालील प्रमाणे आहे.

मिळकतींचे वर्णन

मौजे	विद्यमान मालक	गट नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पै.)
वढाव खुर्द	जयंत गजानन पाटील	४८/२	०-२४-०	५.४१

वरील मिळकती बाबत अन्य कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, साठेकरार, भाडेपट्टाकरार खरेदी मेन्टेनस, मेहेर, कर्ज वगैरे बाबतचा कसलाही हक्क व हितसंबंध अथवा विक्री व्यवहारास हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती खाली सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आणून द्यावी. सदर मुदतीत हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही हे सर्वांना कळावे.

अलिबाग
तारीख १९/१०/२०२६ **ॲड.रेखा किरण वाघ**
अलिबाग रायगड

जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटिसाने कळविण्यात येते की, मिळकतीचे मालक यांनी त्यांच्या मालकीची व प्रत्यक्ष ताबे कब्जातील खालील मिळकत आहे. सदर मिळकतीच्या विक्री संदर्भात बोलणी आमचे पक्षकार यांच्याबरोबर मिळकतीच्या मालकांनी विक्री व्यवहार केलेला आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

-: मिळकतीचे वर्णन :-

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रु.पैसे)
बापळे ता.अलिबाग.	२६४	०-१२-४० पो.ख. ०-०४-८० एकुण क्षेत्र ०-१७-२०	२.००

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बोजा, बक्षिस, दान, जप्ती, लिज अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी दाखल करण्यात याव्यात. याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत असे गृहीत धरुन त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण : अलिबाग
दिनांक १९/१०/२०२६ **ॲड. कौस्तुभ पुनकर**
पत्ता : जिल्हा न्यायालय
रायगड-अलिबाग
९७६५०७०००९

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे वढाव खुर्द ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद जमिन मिळकत ही आमचे अशिल यांनी खालील नमूद मिळकतींचे विद्यमान मालक यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे. मिळकतींचे वर्णन खालील प्रमाणे आहे.

मिळकतींचे वर्णन

मौजे	विद्यमान मालक	गट नं.	क्षेत्र (हे.आर.)	आकार (रू.पै.)
वढाव खुर्द	सचिन नंदकुमार नाईक	५४	०-१४-०	३.५०

वरील मिळकती बाबत अन्य कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध बोजा, अथवा, गहाण, दान, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, साठेकरार भाडेपट्टाकरार खरेदी मेन्टेनस, मेहेर, कर्ज वगैरे बाबतचा कसलाही हक्क व हितसंबंध अथवा विक्री व्यवहारास हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती खाली सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आणून द्यावी. सदर मुदतीत हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही हे सर्वाना कळावे.

अलिबाग **ॲड. रेखा किरण वाघ**
तारीख १९/१०/२०२६ अलिबाग रायगड

दिनांक २०/१०/२०२६

नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे नागाव, अलिबाग, जि. रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक १) दत्तु हरी टिवळेकर, २) वसंत हरी टिवळेकर यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

मौजे नागाव, ता. अलिबाग, जि. रायगड

मौजे	भुमापन क्रमांक व उपविभाग	क्षेत्रफळ (आर.चौ.मी.)	आकार (रू.पैसे)
नागाव ता.अलिबाग	७७०	७-३०-००	७३.००

वर नमुद बिनशेती मिळकतीमधील १) दत्तु हरी टिवळेकर, २) वसंत हरी टिवळेकर यांच्या असलेल्या अविभाज्य हिश्याबाबत

दिनांक : २०/१०/२०२६
अशिलांची सही **ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट
जे. एस. एम कॉलेज जवळ, अलिबाग- रायगड
मोबा. ९७६७०१०९०२

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक काशिनाथ गोपाळ खडे व इतर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

मौजे मांडवणे तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत

सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर	क्षेत्र (हे. आर. पॉ.)	आकार रु पैसे
११/११	एकुण क्षेत्र ०-०६-०० हे आर पॉ	०-०२

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :२०/१०/२०२६
खरेदीदारातर्फे वकील ॲड.निलेश कान्हु मोरे
मोबा. ९८२२६९११०९
पत्ता- दहिवली तर्फे नीड तालुका कर्जत जिल्हा रायगड ४१०२०१

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे-खार दुतर्फा बोर्ली, ता.-पेण, जि.-रायगड येथील खालील वर्णनाची मालमत्ता, मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदीने विकत घेण्याविषयी, आमचे अशिलांनी त्यांच्याबरोबर बोलणी केली आहे.

मालकाचे नाव	ग.क्र./ भू.क्र	एकूण क्षेत्रफळ आर.चौ.मी.	आकार रू. पै.
खाते क्रमांक ७९८ वरील खातेदार, १. प्रभावती नारायण पाटील व इतर खाते क्रमांक ९०३ वरील खातेदार, १. कमळ नरेश चवरकर २. देवकुबाई काशिनाथ पाटील.	१३९/१/अ	ला.यो.०.९१.३० पोट ख.०.०३.३० एकुण ०.९४.६० पैकी, कमळ नरेश चवरकर यांचे क्षेत्र.	१०.०६

तरी सदर मिळकतीवर अन्य कोणाचाही वारसा हक्क, दान, बक्षीस, गहाण, साठेकरार, फरोक्त अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कसलाही हक्क अथवा अधिकार असल्यास किंवा सदर खरेदी बद्दल कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खालील पत्त्यावर योग्य कागदपत्रांसह लेखी हरकत द्यावी. उक्त मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मिळकतीच्या पुढील व्यवहाराबाबत बोलणी करून कार्यवाही पूर्ण केली जाईल व मागावून घेतलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

सही/-
ॲड. सोनाली गंगाधरे शहासने
“सीता-सदन” वाकण, पो.- पाटणसई,
ता.-रोहा, जि. रायगड, ४०२१०६
मो.क्र.७७७५८९०४५५

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेली बिनशेती मिळकत सदर मिळकतीचे मालक श्री. मुकेश भगवत प्रकाश अग्रवाल आणि श्री. अशिष हरसुखराय विज यांचेकडून खरेदी घेण्याचे निश्चित केले आहे. वर नमूद व्यक्तीनी मिळकतीवरील त्यांचे मालकी हक्क, हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा आमचे अशिलांना दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे मापगाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील

भूमापन	क्षेत्र आर.चौ.मी.	आकारणी रू. पै.
११/१७/१८	१४३-८०-००	१४३८.००

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- १९/१०/२०२६
ॲड. रविंद्र वि. ओक “गुरूकृपा”,
अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड.

दिनांक : १७/१०/२०२६

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी मौजे नारवेल, ता. पेण, जि. रायगड येथील पुढीलप्रमाणे वर्णनाची मिळकत असुन सदर मिळकतीचे विद्यमाने मालक/कब्जेदारांपैकी १. श्री.गजानन बळीराम म्हात्रे, २.श्री.अमनचंद बळीराम म्हात्रे, ३.श्रीमती कुसूम दामाजी पाटील, ४.श्रीमती विमल रामदास म्हात्रे, ५. श्रीमती निर्मला गणेश म्हात्रे आणि ६. श्रीमती उषा ज्ञानेश्वर पाटील यांच्या सामाईक हिस्स्याच्या क्षेत्राची मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी कायम खरेदीने घेणेचे ठरविले आहे.

जमिन मिळकतीचे वर्णन
मौजे - नारवेल, ता. पेण, जि. रायगड येथील

मालक/कब्जेदाराचे नाव	गट क्र.	उपविभाग	क्षेत्र हे.-आर.-चौ.मी.	आकार रु.पै.
गजानन बळीराम म्हात्रे अमनचंद बळीराम म्हात्रे कुसूम दामाजी पाटील विमल रामदास म्हात्रे निर्मला गणेश म्हात्रे श्रीमती उषा ज्ञानेश्वर पाटील कमलाबाई बळीराम म्हात्रे	२५१	-	०-२५.८० पैकी ०-२०.००	३.३७

त्याअर्थी सदर मालक/कब्जेदार याचे व्यतिरीक्त सदर मिळकतीसदर्भात अगर त्यांचे कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, लिज, चार्ज, अॅटॅचमेंट, अन्न वस्त्र निवारा, कुळ हक्क, ताबा-कब्जा, एम.ओ.यु, हुकुमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा, संपादन, रिक्विझेशन अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर मालकी हक्कांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ (एकवीस) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्त्यावरील कार्यालयात सादर कराव्यात.

विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकतीवरील श्री. गजानन बळीराम म्हात्रे वगैरे ६ यांचे मालकी हक्क निर्वेध व बोजारहित आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल **श्री. तुषार द. देवरे, ॲडव्होकेट**
दि.: १९/१०/२०२६ पत्ता : फ्लॅट नं. ए-२, जय नगर को.ऑप हौ.सोसा. लि.
कोर्ट रोड, ५२ बंगला, पनवेल ४१० २०६,
जि.रायगड. मोबाईल नं. ९३२५००४००८

जाहीर नोटीस

याद्वारे सर्व जनतेला, माझे अशिलाचे वतीने सूचित करण्यात येते की, माझे अशिल श्री.खोझेम शिराज कॉन्ट्रॅक्टर, वय ६१ वर्षे, रा. रेहाना हाईट्स, फ्लॅट क्र. ३०२, सुपर मार्केटसमोर, चॅपल लेन, एस.व्ही. रोडजवळ, सांताक्रूझ (पश्चिम), मुंबई ४०००५४, हे मौजे सोगांव, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील, भूमापन क्रमांक व उपविभाग ८५ (जुना सर्व्हे क्र. ६१/२अ), एकूण क्षेत्रफळ ०.८४.०० (हे.आर.पॉ.) या मिळकतीचे सध्याचे मालक आहेत. या मिळकतीबाबत ५ जानेवारी १९८७ रोजी अशोक शिवदास आमले (विक्रेता) आणि (१) अब्बास लुकमानजी कॉन्ट्रॅक्टर व (२) शिराज लुकमानजी कॉन्ट्रॅक्टर (खरेदीदार) यांच्यात एक खरेदीखताचा दस्तऐवज निष्पादित करण्यात आला होता, जो अलिबाग येथील दुय्यम निबंधक यांचे कार्यालयात दस्तऐवज अनुक्रम नंबर ६/१९८७ अंतर्गत नोंदणीकृत आहे. सदर मूळ दस्तऐवज अलिबाग परिसरात कुठेतरी हरवला/गहाळ झाला आहे.

सर्वत्र शोध घेऊनही, मालकी हक्काशी संबंधित सदर दस्तऐवज सापडलेला नाही. माझे अशिलाने यासंदर्भात अलिबाग पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली असून, हरवलेल्या मालमत्तेची नोंदणी क्रमांक ०९०७/२०२६ (दिनांक १७/१०/२०२६) अंतर्गत ती नोंदवण्यात आली आहे. अलिबाग पोलीस ठाण्यात जीडी/एसडी/डीडी नंबर ०२६ नुसार, मूळ दस्तऐवज हरवल्याची अधिकृत नोंद करण्यात आली आहे. जर कोणत्याही व्यक्तीस सदर दस्तऐवज सापडला असेल किंवा तो दस्तऐवज इक्विटेबल मॉर्टगेज, कोणताही भार, बोजा किंवा इतर कोणत्याही कारणास्तव त्यांच्या ताब्यात असेल, तर त्यांनी या सूचनेच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत, संबंधित दस्ताबाबत, खाली स्वाक्षरी करणार यांचेकडे तसे कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात कळवावे. तसेच, सदर वर नमुद मुळ दस्त खाली दिलेल्या पत्त्यावर प्रत्यक्ष आणून द्यावा. त्यासाठी येणारा प्रत्यक्ष खर्च माझे अशिल स्वतः अदा करतील आणि/किंवा अशिलास योग्य वाटेल अशी भरपाई माझे अशिलाकडून दिली जाईल.

अलिबाग,
दिनांक : १९/१०/२०२६ सही /-
(ॲड. महेश एकनाथ घरत)
‘गुरूकृपा’ मु.पो. खंडाळे,
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं. ९८२२६३५५१२

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेली शेती मिळकत सदर मिळकतीचे मालक श्री. संजय श्यामसुंदर सेकसरीया यांचेकडून खरेदी घेण्याचे निश्चित केले आहे. वर नमूद व्यक्तीनी मिळकतीवरील त्यांचे मालकी हक्क, हितसंबंध निर्वेध असल्याचा भरवसा आमचे अशिलांना दिलेला आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे मापगाव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील

भूमापन	क्षेत्र हे.आर.चौ.मी.	आकार रू.पै.
१९	००-३६-००	८.७५

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, ताबा, वहिवाट, दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करण्यात येईल व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

दिनांक :- १९/१०/२०२६
ॲड. रविंद्र वि. ओक
“गुरूकृपा” अलिबाग अर्बन बँकेशेजारी,
महर्षी कर्वे रोड,
मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे गौरकामत, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या शेतजमीन मिळकती तिचे मालक श्री. गणेश विष्णु वैद्य यांजकडून कायमच्या खरेदी करण्याचे ठरविले आहे.

सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्रफळ (हे.आर)	आकार (रू.पै.)
२८	१	०-०४-३०	०-०३
१२३	७	०-१४-००	०-१२

वर वर्णन केलेल्या मिळकतींबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठे करार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अॅटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आम चे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतींच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : १९/१०/२०२६
ॲड. महेश मोतीराम घारे
मु.सांगवी, ता.कर्जत, जि.रायगड
मो.९८८१८५८६५४
९२७१८६९२०२

“जाहिर नोटीस”

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल श्री. महेश मधुकर पाटील यांनी श्री. सतीश नथुराम तरे यांच्याकडून निवासी सदनिका मिळकत मौजे. नागडोंगरी चेंढरे ता. अलिबाग, जि. रायगड, येथील गावठाण प्लॉट नं. १६६ व १६७ बी या मिळकतीवर बांधण्यात आलेली “सदाशिव कॉम्प्लेक्स को. ऑप. हौ. सोसायटी. लि” मधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका नं. २०२ क्षेत्र ७७८ चौ. फूट बिल्ट-अप ही खरेदीखताने विकत घेतली होती.

सदर निवासी सदनिका ही श्री. सतीश नथुराम तरे यांनी दिनांक २८/०९/२०१० रोजी मेसर्स. चेतना एंटरप्राइजेस तर्फे भागीदार श्री. घनशाम रतनचंद पुरस्वानी व श्रीमती. मधु अमरलाल पुरस्वानी यांच्याकडून खरेदीखताने विकत घेतली आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालील परिशिष्टात नमुद केलेले आहे. सदर मुळ खरेदीखत हे आमच्या अशिलांकडून अलिबाग शहरात प्रवासा दरम्यान दिनांक ०८/१०/२०२६ रोजी हरविले आहे. सदर हरविलेल्या नोंदणीकृत दस्ताची अलिबाग पोलीस स्टेशन येथे दिनांक १६/१०/२०२६ रोजी तक्रार केली आहे.

मात्र तरी देखील वर नमुद केलेल्या मिळकतीवर खालील परिशिष्टात नमुद केलेल्या खरेदीखताच्या मुळ दस्ताच्या आधारे कोणाचाही विक्री, गहाण, दान, बोजा, बक्षिस, लिज, लीएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा सदरचा मुळ दस्त त्यांच्या ताब्यात असल्यास त्यांनी त्यांची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पंधरा दिवसांच्या आत खाली दिलेल्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरूपात कळवावी.

परिशिष्ट

दिनांक २८/०९/२०१० रोजीचा दुय्यम निबंधक अलिबाग यांचेकडील दस्त क्रं. अलब/३६४३/२०१० कडे नोंदविण्यात आलेला आहे. लिहून घेणार श्री.सतीश नथुराम तरे व लिहून देणार मेसर्स चेतना एंटरप्राइजेस तर्फे भागीदार श्री.घनशाम रतनचंद पुरस्वानी व श्रीमती.मधु अमरलाल पुरस्वानी यांच्यामध्ये झालेला मौजे. नागडोंगरी चेंढरे ता.अलिबाग, जि.रायगड, येथील गावठाण प्लॉट नं.१६६ व १६७ बी या मिळकतीवर बांधण्यात आलेली “सदाशिव कॉम्प्लेक्स को.ऑप.हौ.सोसायटी लि.” मधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका नं. २०२, क्षेत्र ७७८ चौ. फूट बिल्टअप या मिळकती संदर्भातील खरेदीखताचा मूळ दस्त हा या नोटीसचा विषय आहे.


अलिबाग सही /-
दि. २०/१०/२०२६ **ॲड. सौ. गौरी गिरीश म्हात्रे**
डी-२ हिराबाग मोदकम
हॉटेलच्या वर जिल्हा
न्यायालयासमोर, अलिबाग
रायगड, मो.नं.९२७१७७५२७७

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

झिम्बाब्वेला हरवून भारताने जिंकली मालिका

● शेफाली-स्मृतीकडून चौकार, षटकारांचा पाऊस ; ९ व्या षटकामध्येच विजयाला गवसणी

। रायपूर । वृत्तसंस्था ।

रायपूरच्या शहीद वीर नारायण सिंह इंटरनॅशन स्टेडियम येथे पार पडलेल्या तीन टी-२० सामन्यांच्या मालिकेतील दुसऱ्या सामन्यात भारताने ९ विकेट्सने विजय मिळवत सामन्यासह मालिका आपल्या खिशात घातली. झिम्बॉब्वेने प्रथम फलंदाजी करत ८ बाद १०३ धावांचे तुल्यबळ आव्हान भारतासमोर दिले होते.



या धावांचा पाठलाग करताना मागील सामन्यात सपशेल फेल ठरलेल्या पहिल्या फळीने यंदा मात्र त्याचा वचपा काढला व ११ ओव्हर्स शिल्लक राखत दुसरा सामना तर जिंकलाच, तसेच मालिकाही आपल्या नावे केली. या सामन्यात सलामीला आलेल्या शेफाली वर्मा व कर्णधार स्मृती मंधानाने चौकार व षटकारांचा अक्षरशः पाऊसच पाडला.

झिम्बॉब्वेने दिलेल्या धावांचा पाठलाग करताना शेफाली वर्मा व कर्णधार स्मृती मंधानाने चौकार व षटकार ठोकण्यास सुरुवात केली. चौथ्या ओव्हर्सपर्यंत शेफालीने दोन वेळा चेंडू सीमारेषेच्या पारही पोहचवला होता. या दोघींचा आक्रमकपणा पाहता, झिम्बॉब्वेच्या गोलंदाजांसह क्षेत्ररक्षक दबावात आले. दरम्यान, पाचव्याच ओव्हर्समध्ये भारताने धावांचे अर्धशतक गाठले होते. शेफालीने ६ चौकार व ४ षटकारांसह ५५ धावा केल्या, तर स्मृतीने ६ चौकार व २ षटकारासह नाबाद ४७ धावांनी तिला चांगली साथ दिली. भारताने अशाप्रकारे ६७ बॉल शिल्लक राखत हा सामना जिंकला.

त्याच्या दोन ओव्हर्सनंतर दीप्ति शर्माने बिलव्हड बिझा (७) हरमनप्रीत कौरकरवी झेलबाद करत तिलाही पॉव्हेलियनचा रस्ता दाखवला. तसेच पहिल्या सामन्यात ४३ धावा करणारी शेरन मेयर्स या सामन्यात फक्त ९ धावांचे योगदान देऊ शकली.

क्रांती गौडची ती शिकार ठरली. मधल्या काळात चिपोमुग्री टिरीपानो व कर्णधार जोसेफिन कोमो (नाबाद २७) यांनी चौथ्या विकेटसाठी ४५ धावांची भागीदारी रचत संघाचा डाव सावरला.

या भागीदारीमुळेच झिम्बॉब्वे शंभर धावापर्यंत मजल मारू शकली. दरम्यान, निकी प्रसादने यष्टीमागे रिचा घोषकरवी चिपोला बाद केले.

चिपोने ५ चौकारासह ३४ धावा केल्या. त्यानंतर आलेल्या न्यासा ग्वान्झुरूला निकीने त्रिफळाचीत करत तिला आपले खातेही खोलू दिले नाही. भारताकडून निकीने २ ओव्हर्समध्ये ७ धावा देत २ गडी बाद केले.

चिपो व जोसेफिनने डाव सावरला

झिम्बॉब्वेने पहिल्या सामन्यात सुरुवातीपासून आक्रमक भूमिका घेतली होती. दुसऱ्या सामन्यात टॉस जिंकून त्यांनी तशीच काहीशी कामगिरी करण्याच्या हेतूने प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला, पण मागील सामन्यात ४२ धावांची कामगिरी करणारी केलीस एनधलोवू या सामन्यात भोपळाही फोडू शकली नाही. नंदनी शर्माने त्रिफळाचीत करत चौथ्याच षटकात झिम्बॉब्वेला जबर धक्का दिला.

निवडक



शीतल देवीने रचला नवा इतिहास

जपान : पॅरा तिरंदाज शीतल देवीने शानदार कामगिरी केली आहे. तिने ७२० पैकी ७०४ गुण मिळवून विश्वविक्रमाची बरोबरी केली आणि एक नवीन आशियाई विक्रमही प्रस्थापित केला. आशियाई पॅरा गेम्समध्ये इतिहास रचत, शीतल देवीने पात्रता फेरीत शानदार कामगिरी केली, विश्वविक्रमाची बरोबरी केली आणि पुढील फेरीत प्रवेश केला. शीतल देवीने पॅरा कंपाऊंड महिला रँकिंग फेरीत शानदार कामगिरी केली. तिने ७०४ गुणांसह प्रथम स्थान पटकावले, एक नवीन आशियाई विक्रम प्रस्थापित केला आणि विश्वविक्रमाची बरोबरी केली. शीतलने ३२ बाण अचूकपणे मारले आणि इतर २५ बाणांमध्ये पूर्ण १० गुण मिळवले. तिने एकूण ५७ बाणांमध्ये पूर्ण गुण मिळवले. पायल नागने तिच्या पहिल्या आशियाई गेम्समध्ये शानदार कामगिरी केली. तिने ६७५ गुण मिळवले, ज्यात १२ एक्स आणि २० १० गुणांचा समावेश होता. या प्रभावी गुणांमुळे तिला रँकिंग राऊंडमध्ये पाचव्या स्थानासाठी बरोबरी साधता आली. शीतल देवी आणि पायल नाग यांचा समावेश असलेल्या भारतीय संघानेही पॅरा कंपाऊंड महिला दुहेरीच्या रँकिंग राऊंडमध्ये एकूण १३७९ गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला.

बाबर आझमच्या नावावर वर्ल्ड रेकॉर्ड

लाहोर : पाकिस्तान संघाचा स्टार क्रिकेटपटू बाबर आझम सध्या चर्चेत आहे. पाकिस्तान, श्रीलंका आणि इंग्लंड यांच्यात तिरंगी मालिका खेळवली जात आहे. ही मालिका ३१ ऑक्टोबरपर्यंत पाकिस्तानमधील रावळपिंडी आणि लाहोर येथे खेळवली जात आहे.या मालिकेत श्रीलंकेविरुद्ध खेळताना बाबर आझमने एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. त्याने दक्षिण आफ्रिकेचा माजी खेळाडू हाशिम आमलाचा विक्रम मोडीत काढला आहे. बाबर आझमने या सामन्यात अर्धशतक पूर्ण केले नाही. मात्र, ४५ धावांची शानदार खेळी करत त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १६ हजार धावांचा टप्पा गाठला. अशी कामगिरी करणारा तो पाकिस्तानचा पाचवा फलंदाज ठरला. याबरोबरच बाबरने १४१ डावांनंतर सर्वाधिक धावा करण्याचा विक्रमही आपल्या नावावर केला आहे. त्याच्या नावावर २० शतके आणि ३८ अर्धशतके आहेत.एकदिवसीय क्रिकेटमध्ये १४१ डावांनंतर सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम यापूर्वी दक्षिण आफ्रिकेचा माजी खेळाडू हाशिम आमलाच्या नावावर होता. त्याने १४१ डावांमध्ये ६६२६ धावा केल्या होत्या. मात्र, बाबर आझमने आमलापेक्षा ४५ धावा जास्त करत हा विक्रम आपल्या नावावर केला. त्यामुळे १४१ डावांनंतर वनडेमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत बाबर आझम पहिल्या क्रमांकावर पोहोचला आहे.





वेस्ट इंडिज बनला वर्ल्ड चॅम्पियन

लंडन : वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लेजेंड्स २०२६ अंतिम सामना वेस्ट इंडिज आणि इंग्लंड यांच्यात खेळला गेला. वेस्ट इंडिज चॅम्पियन्सने उत्कृष्ट कामगिरी करत इंग्लंड चॅम्पियन्सना ९ विकेट्सने धुव्वा उडवला. दणदणीत विजयासह ट्रॉफीवर कब्जा केला. अंतिम सामन्यात, इंग्लंड चॅम्पियन्सने प्रथम फलंदाजी करत १६० धावांचे लक्ष्य ठेवले. प्रत्युत्तरात, वेस्ट इंडिज चॅम्पियन्सने आपल्या आक्रमक फलंदाजीच्या जोरावर १७ षटकांत केवळ १ विकेट गमावून १६५ धावा करत एकतर्फी विजय मिळवला. डब्ल्यूसीएल २०२६ चा अंतिम सामना वेस्ट इंडिज चॅम्पियन्स आणि इंग्लंड चॅम्पियन्स यांच्यात खेळला गेला. शारजा क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात इंग्लंडने प्रथम फलंदाजी केली. इंग्लंड संघाकडून मोईन अलीने सर्वाधिक ६० धावा केल्या. ओवैस शाहनेही ३८ धावा केल्या. त्यांनी २० षटकांत ७ विकेट्स गमावून १५९ धावा केल्या. वेस्ट इंडिजकडून ड्वेन ब्राव्होने ३ विकेट्स घेतले. अंतिम सामना जिंकण्यासाठी वेस्ट इंडिजला १६० धावांची गरज होती. कर्णधार ख्रिस गेल आणि लेंडल सिमन्स यांनी शानदार सुरुवात करून दिली. गेलने १४ चेंडूंमध्ये १ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने २१ धावा केल्या. तो बाद झाल्यानंतर, सिमन्सने चॅडविक वॉल्टनसोबत भागीदारी केली.

'हार्दिकचा पर्याय शोधणे थांबवा'

मुंबई : हार्दिक पंड्या आणि त्याची तंदुरुस्ती हा सध्या चर्चेला विषय राहिला असला, तरी भारताचे माजी कर्णधार सुनील गावस्कर यांनी हार्दिक पंड्या हा स्वतंत्र शैलीचा खेळाडू असून, त्याला पर्याय शोधण्यात सध्या आपण भरकटत चाललो आहोत असे स्पष्ट मत व्यक्त केले. केवळ फलंदाजीची लांबी वाढवण्यासाठी गोलंदाजीच्या ताकदीशी तडजोड करण्याऐवजी, भारताने किमान चार तज्ज्ञ गोलंदाजांसह मैदानात उतरायला हवे. पाचवा आणि सहावा पर्याय म्हणून फलंदाजीतही योगदान देऊ शकणाऱ्या अष्टपैलू खेळाडूंचा विचार केला पाहिजे. त्यासाठी पंड्याला पर्याय शोधण्यापेक्षा वेगवेगळ्या भूमिका चोख बजावू शकतील अशा खेळाडूंकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे गावस्कर म्हणाले.हार्दिक पंड्याचा पर्याय शोधण्याच्या प्रयत्नात आपण कधीकधी जरा जास्तच वाहवत जातो. हार्दिक हा असा खेळाडू आहे की ज्याची जागा कोणीही घेऊ शकत नाही. तुम्हाला त्याच्या तोडीचा खेळाडू मिळत नसेल, तर थोडी वेगळी भूमिका बजावू शकणाऱ्या खेळाडूसोबत पुढे जा, असे गावस्कर यांनी सांगितले. गावस्कर यांनी यासाठी वेगवेगळ्या खेळाडूंची उदाहरणे देखील दिली.

रिंकू सिंगने पुनरागमनासाठी ठोकली दावेदारी

। कानपूर । वृत्तसंस्था ।

रिंकू सिंग सध्या दमदार फॉर्ममध्ये असून त्याने सलग दुसरे शतक रणजी ट्रॉफी २०२६-२७ हंगामात झळकावले आहे. सध्या रणजी ट्रॉफीची दुसरी फेरी सुरू असून या फेरीत उत्तर प्रदेशचा सामना कानपूरमध्ये गोवाविरुद्ध सुरू आहे. या सामन्याच्या पहिल्याच दिवशी उत्तर प्रदेशसाठी रिंकू सिंग संकटमोचक ठरला. त्याने पहिल्याच दिवशी गोव्याविरुद्ध शतक केलं, त्यामुळे उत्तर प्रदेशला २०० धावांचा टप्पाही ओलांडता आला.



या सामन्यात उत्तर प्रदेशने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पण अभिषेक गोस्वामीला ऋत्विक नाईकने ५ धावांवरच बाद केले. त्यानंतर माधव कौशिकला कर्णधार आर्यन जुयालने साथ देण्याचा प्रयत्न केला, पण १२ व्या षटकात जुयालला१४ धावांवर ऋत्विक नाईकनेच बाद केले, तर करण शर्मा शून्यावर धावबाद झाला. यानंतर मात्र माधवला रिंकूची चांगली साथ मिळाली. या दोघांनी डाव सावरत ५७ धावांची भागीदारी केली. पण माधव ३२ व्या षटकात ४५ धावांवर बाद झाला. पाठोपाठ आराध्य यादवने १ धावेवर आणि झिशान अन्सारीने २ धावांवर विकेट गमावली.

त्यानंतर कार्तिक यादव आणि कार्तिक त्यागी यांनी संयमी खेळ करत रिंकूला साथ दिली. रिंकू एका बाजूने चांगला खेळ करत डाव पुढे नेत होता. कार्तिक यादवने ३० चेंडूत ६ धावा केल्या, तर कार्तिक त्यागी २४ चेंडूत ५ धावांवर बाद झाला. यश दयालही शून्यावरच परतला. पण शेवटी वंश चौधरीने रिंकूला साथ दिली. रिंकूने त्याचे शतक पूर्ण केले. या दोघांमध्ये १० व्या विकेटसाठी ६५ धावांची भागीदारी झाली. पण अखेर वंश २६ चेंडूत ४ धावांवर बाद झाल्याने उत्तर प्रदेशचा डाव ७१ षटकात २०२ धावांवर संपला.रिंकू सिंगने १८६ चेंडूत ११ चौकार आणि २ षटकारांसह नाबाद ११८ धावा केल्या. हे त्याचे सलग दुसरे शतक आहे. त्याने रणजी ट्रॉफीच्या पहिल्या फेरीत बिहारविरुद्ध शतक करताना ११२ धावांची खेळी केली होती.

सूर्यकुमार यादवचा फॅशनच्या दुनियेत डेब्यू!

। मुंबई । प्रतिनिधी ।

टी-२० संघाचा माजी कर्णधार सूर्यकुमार यादव हटके अंदाजामुळे चर्चेत आला आहे. सूर्याने लॅक्मे फॅशन वीकमध्ये रॅम्प वॉक करत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. विशेष म्हणजे, रॅम्पवर चालताना त्याने आपल्या प्रसिद्ध सुपला शॉटची पोझही दिली. त्याचा हा अनोखा अंदाज कॅमेऱ्यात कैद झाला असून, या रॅम्प वॉकचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.

लॅक्मे फॅशन वीक २०२६च्या अखेरच्या दिवशी भारताचा क्रिकेटपटू सूर्यकुमार यादवच्या उपस्थितीने सर्वच जण थक्क झाले. १९ ऑक्टोबरला सूर्याने पहिल्यांदाच रॅम्प वॉक करत फॅशनच्या दुनियेत पदार्पण केलं. नवी दिल्लीत झालेल्या या फॅशन शोमध्ये तो रेमंडच्या एथनिक्सफ्या ब्रँडचा शोस्टॉपर बनला होता. यावेळी सूर्याने आयव्हरी रंगाचा आकर्षक इंडो-वेस्टर्न पोशाख परिधान केला होता. सूर्याच्या पोशाखावरील प्रिंट त्या जॅकेटची अधिक शोभा वाढवत होती.



● श्रीबाग २ येथील अंबा माता मंदिर येथे नवरात्रोत्सवानिमित्त आठव्या माळेला फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी चिमुकल्यांनी केलेली वेशभूषा लक्ष वेधणारी ठरली.



● नवरात्रोत्सवानिमित्त श्रीबाग २ येथील अंबा माता मंदिरासमोरील कार्यक्रमात महिलांनी बंगाली पारंपरिक वेशभूषा करून उपस्थित प्रेक्षकांचे लक्ष वेधले होते.



● श्रीबाग २ येथील अंबा माता मंदिर येथे नवरात्रोत्सवानिमित्त रात्री रास गरबा नृत्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अलिबागकरांनी गरबा नृत्यावर फेर धरला होता.

चॅकारा डीपी वर्ल्ड इंडिया चॅम्पियनशिपचा विजेता

पुणे : स्पेनच्या युजेनिओ चॅकाराने तिसऱ्या फेरीत मिळवलेली पकड अखेरपर्यंत कायम राखताना डीपी वर्ल्ड इंडिया चॅम्पियनशिपमध्ये विजेतेपदाचा बहुमान मिळवला. डीपी वर्ल्ड स्पर्धा मालिकेतील २०२६ या मौसमातील त्याचे हे तिसरे विजेतेपद ठरले. इतकेच नव्हे तर डीपी वर्ल्ड यांनी जाहीर केलेल्या दुबई वर्ल्ड जागतिक क्रमवारीत त्याने अग्र स्थानाकडे झेप घेतली. आबुदाबी व दुबई येथे केवळ दोनच स्पर्धा बाकी असताना या मौसमाअखेर जाहीर होणाऱ्या मानांकनासाठीच्या शर्यतीत चॅकाराने पॅट्रिक रीड आणि रोरी मॅकएलरॉय या नजीकच्या प्रतिस्पर्ध्यांवर आघाडी घेतली आहे. दिल्ली गोल्फ कोर्सवर पार पडलेल्या या स्पर्धेत ४० लाख डॉलर्स पारितोषिकाची रकमेतील अखेरचा दिवस सर्वच खेळाडूंसाठी व्यस्त ठरला.चॅकाराने हि तिसऱ्या फेरीतील राहिलेली ७ होल पूर्ण करताना ३ बर्डीज आणि एका इगल सह ५ अंडर अशी कामगिरी बजावली. चॅकाराची चारही फेऱ्यांमधील कामगिरी ६७-६७-६३-७०अशी होती.



मुंबईकर चिन्मय सुतारची ४०० धावांची विक्रमी खेळी

। मुंबई । प्रतिनिधी ।

रणजी ट्रॉफी २०२६-२७ स्पर्धेत ऐतिहासिक विक्रम पाहायला मिळाला. मिझोरमच्या चिन्मय सुतारने सोमवारी नागालँड क्रिकेट स्टेडियममध्ये रणजी ट्रॉफीच्या प्लेट डिव्हिजनमध्ये नागालँडविरुद्ध खेळताना ४०० धावांचा टप्पा गाठला. यासह देशांतर्गत क्रिकेटमध्ये ४०० धावा करणारा तो दुसरा फलंदाज ठरला.

चिन्मय सुतारने क्रिकेटच्या इतिहासात ४०० धावांचा टप्पा गाठणाऱ्या एकूण १० फलंदाजांच्या विशेष यादीत स्थान मिळवलं आहे. या यादीत ब्रायन लारा, डॉन ब्रॅडमन यांसारख्या दिग्गज फलंदाजांचाही समावेश आहे. ब्रायन लाराने १९९४ मध्ये वॉर्विकशायरकडून डरहॅमविरुद्ध खेळताना नाबाद ५०१ धावांची ऐतिहासिक खेळी केली होती. त्यानंतर २००४ मध्ये वेस्ट इंडिजकडून इंग्लंडविरुद्ध खेळताना त्याने पुन्हा ४०० धावांचा टप्पा गाठला. या कसोटी सामन्यात लाराने नाबाद ४०० धावा केल्या होत्या. चिन्मयने आपल्या पदार्पणाच्या सामन्यात ९९ धावा केल्या होत्या. मात्र, त्याला धावबाद होऊन माघारी परतावं लागलं होतं. मिझोरम कडून खेळण्यापूर्वी या डावखुऱ्या फलंदाजाने मुंबईच्या प्रतिष्ठित देशांतर्गत संघाकडून विजय हजारे ट्रॉफीमध्ये सहभाग घेतला होता.

अवनी लेखराला रौप्य पदक | **शूटिंगमध्ये भारताचा दबदबा**

मोना अग्रवालने जिंकले गोल्ड मेडल

। जपान । वृत्तसंस्था ।

जपानमध्ये सध्या एशियन पॅरा गेम्सला झाली सुरुवात झाली आहे. आशियाई पॅरा गेम्सच्या पहिल्याच दिवशी भारताच्या खेळाडूंनी ऐतिहासिक आणि शानदार खेळ केला आहे. भारताने आपले पदकांचे खाते उघडले आहे. शूटिंग स्पर्धेत भारताच्या खेळाडूंनी देशासाठी पदक जिंकले आहे. या खेळ प्रकारात भारताने गोल्ड आणि रौप्य अशी दोन पदके जिंकली आहेत.

महिलांच्या १० मीटर एअर रायफल एसएच-१ या स्पर्धेत भारताच्या मोना अग्रवालने सुंदर खेळ करत सुवर्णपदक जिंकले आहे. तर दुसरीकडे देशाची स्टार पॅराॲथलीट आणि दोन वेळा पॅरालिम्पिक चॅम्पियन राहिलेली अवनि लेखरा हिने देखील चमकदार खेळ करत सिल्व्हर मेडल जिंकले आहे. या रोमांचक आणि शानदार खेळात पदके जिंकून भारताची मान अभिमानाने उंचावली आहे.



स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी एकाच प्रकारात सुवर्ण आणि रजत पदक जिंकून भारताने आपल्या विजयी मोहिमेची जोरदार सुरुवात केली आहे. या दोघींच्या या ऐतिहासिक यशाबद्दल संपूर्ण देशभरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या स्पर्धेत भारतीय खेळाडूंकडून अशाच सुवर्ण कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

पॅरिस पॅरालिम्पिकची कांस्य पदक विजेता मोना अग्रवाल हिने सोमवारी अत्यंत आक्रमक आणि अचूक लय दाखवत महिलांच्या १० मीटर एअर रायफल एसएच-१ स्पर्धेत सुवर्णपदक आपल्या नावावर केले. मोना अग्रवाल हिने फायनलमध्ये शानदार फॉर्म दाखवत २५०.० पॉईंट्सची कामगिरी केली. याच स्पर्धेत भारताच्या दोन वेळा पॅरालिम्पिक चॅम्पियन अवनि लेखरा हिने रजत पदक पटकावले होते. पॅरिस पॅरालिम्पिकची कांस्य पदक विजेता मोना अग्रवाल सोमवारी अत्यंत आक्रमक खेळ करताना दिसून आली. अतिशय रोमांचक ठरलेल्या या अंतिम फेरीत मोना अग्रवालने शेवटच्या शॉटवर बाजी मारली.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)